जयश्री पटवर्धन

जनी जाणता

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

जनी जाणता

लेखिका : जयश्री पटवर्धन

जनी जाणता

लेखिका : जयश्री पटवर्धन

पत्ता- 20/1A/1 प्लॉट नं 3, विनायक बंगला,
बसवनगर रोड
कागवाड 591223
कर्नाटक.
फोन नं- 7406983273

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यापुर्वी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
या नंबरवर नावगाव कळवा. पुस्तके मिळवा.

प्रकाशन : १५ ऑगस्ट २०२६

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

हे पुस्तक छापील स्वरुपात उपलब्ध आहे.
देणगी मूल्य रु. १७०/- (पोस्टेज वेगळे).
संपर्क- : जयश्री पटवर्धन- 7406983273
दहा किंवा अधिक प्रतींवर सवलत मिळेल.

परिचय

सांगली माझे माहेर. वयाच्या विसाव्या वर्षी मला एम. एस. ई .बी. मध्ये नोकरी मिळाली. सहा वर्षे नोकरी केल्यावर माझा विवाह कागवाड च्या श्री सतीश पटवर्धन यांचे बरोबर झाला. पटवर्धन घराणे हे संस्थानिकांचे. पण कूळ कायदा व 1948 ची जाळपोळ यामुळे त्यांचे बरेच नुकसान झाले. हे संस्थान 1857 मध्येच विलीन झाले होते. त्यामुळे पुढील पिढ्यातील मुलांनी अर्थार्जनासाठी शिक्षणानंतर नोकरी स्विकारली. पटवर्धन मंडळी खेड्यात राहात असली तरी खूप आधुनिक विचारांची व अतिशय सुसंस्कृत अशी होती. मनाने ती श्रीमंत होती. त्यामुळे सांगली सारख्या शहरातून मी खेड्यात आले याचे दु:ख मला झाले नाही. वयाच्या चाळीसाव्या वर्षापासून मी सामाजिक कार्यात भाग घेऊ लागले व विविध सामाजिक उपक्रम राबविले. माझे वडील गीता प्रवचनकार होते. त्यामुळे लहानपणापासूनच कर्मयोगाचे संस्कार आम्हा सर्व भावंडांच्या वर झालेले होते. कागवाड येथील मराठी शाळेचे इमारत बांधकाम मी त्यात भाग घेऊन हिरिरीने केले. येथे विविध प्रकारची शिबिरे आम्ही घेतली. रक्तदान, नेत्रदान, अपंगांसाठी उपयोगी साधने देण्याचे शिबीर, मुलांसाठी शैक्षणिक शिबिर, महिला शिबीर, ही शिबिरे लोकांना खूपच आवडली.

मी वैयक्तिक स्तरावर ही सामाजिक कामे केली. मला वाचनाची अतिशय आवड. आवडलेल्या पुस्तकांच्या लेखकांना मी आवर्जून पत्र लिहायची. बऱ्याच लेखकांची मला उत्तरे देखील आली आहेत. त्यातूनच काही लेखकांची व्याख्यानेही येथे आयोजित केली.

मतिमंद मुलांकडून शाळेतून ज्या कलावस्तू बनवून घेतल्या जातात, त्या विक्रीच्या माध्यमातून मी लोकांसमोर आणीत होते. हेतू एवढाच की त्या मुलांना अर्थाजन व्हावे. या वस्तू विक्रीच्या वेळी एक चांगला अनुभव मला आला आहे. सांगली येथील गाडगीळ सराफ यांचेकडे मी जायचे ठरवले. सांगलीतील आमदार सुधीर दादा गाडगीळ यांना मी भेटले व मतिमंद मुलांसाठी च्या कलावस्तू विक्रीबाबतची माझी कल्पना त्यांना सांगितली. या गाडगीळ मंडळींचे विश्रामबाग येथेही सराफी दुकान आहे. दिवाळीच्या वेळी जर ग्राहकाने दहा ग्रॅम सोने घेतले तर त्याला त्यांच्या दुकानाच्या वतीने मतिमंद मुलांनी बनवलेल्या वस्तूपैकी एक वस्तू गिफ्ट म्हणून द्यावी. त्यात गाडगीळ यांचेही नाव होईल व मुलांना अधिक अर्थार्जन मिळेल. त्यांना ही कल्पना आवडली. आमदारांनी मला त्यांच्या दुकानी पाठविले. मी त्यांना वस्तुंचा कॅटलॉग दाखवला. त्यातून त्यांनी मोबाईल ठेवण्यासाठीची पर्स निवडली आणि एकंदर ऐंशी हजार रुपयाच्या मोबाईल पर्सेस मागविल्या. आम्हाला खूप आनंद झाला. खरंच दुसऱ्यासाठी काही करत असताना त्यात यश आले की मिळणारं समाधान वेगळच असतं!

मी कागवाड ग्रामपंचायतीमध्ये निवडून येण्यासाठी दोन वेळेला निवडणुकीस उभे राहून निवडून आले व दहा वर्षे ग्रामपंचायतीत काम केले. हेतू एवढाच होता की पंचायतीत चाललेला कारभार पहावा व समाजासाठी पंचायतीच्या वतीने काही करता आले तर करावे. माझ्या आयुष्यात मी

समाजाकडूनही भरपूर आदर मिळवला. पुढे निवडून आलेले सरपंचही माझा सल्ला विचारायला घरी येत असत. अर्थात मी जे हे सर्व करु शकले ते माझ्या पतीच्या पुर्ण पाठिंब्यामुळेच. असा नवरा मिळायलाही भाग्य लागते. ते मला मिळाले व त्यामुळे मी समाधानी आयुष्य जगू शकले.

-जयश्री पटवर्धन

जयश्री पटवर्धन यांनी लिहिलेल्या प्रकाशित होऊन गाजलेल्या पहिल्या नऊ पुस्तकांची यादी अंतीम पेज वर आहे.

जनी जाणत्यांची गोष्ट.

आटपाट नगर होते. खूप खूप मोठे. तिथे वर्तमानपत्रे होती. टिव्ही होते. इंटरनेटही होते. सोशल मिडियाही होता. या सर्वांवर नेहमी गरमागरम बातम्या येत. कुठे श्रीमंत बापाच्या मुलाने नशेमधे गाडी चालवत लोकांना चिरडले. कुठे होणाऱ्या नवऱ्याला त्याच्या सात जन्म साथ देऊ पहाणाऱ्या नवरीनेच कड्यावरून ढलून दिले. कुठे मदिराच्या गाभाऱ्यातच भ्रष्टाचार झाला तर कुठे चिमुरडीवर म्हाताऱ्याने बलात्कार केला. कुठे लूटमार, कुठे कोयता गँगची दहशत. या सर्वांच्या मुळाशी भ्रष्टाचार आणि स्वार्थ होता. पण भ्रष्टाचाराशी दोन हात करण्याच्या बाता करणारेही स्वतः भ्रष्टाचार करत होते. रोज याच बातम्या. रोज याच चर्चा.

आणि तरीही जग व्यवस्थित सुरू होते. मुले अभ्यास करत होती. अपंग मुलेही प्रगती करत होती. गरीब मुलेही शिकत होती. लोक कष्टाचे पैसे मिळवत होते. सर्वसामान्य जनांचे आयुष्यमान वाढत होते. आपल्या घरात सुखशांतीने रहात होते. रस्त्यावर गाड्यांची संख्या वाढत होती. उंच इमारती वाढत होत्या. सर्वत्र प्रगतीही सुरू होती. सर्वसामान्य जनता आशावादाने जगत होती.

याचे कारण म्हणजे या जगात अनेक जाणते वावरत होते. ते अपंगांसाठी शाळा काढत होते. शाळांसाठी आपली जमीन आपले धन देत होते. लोकांच्या भल्यासाठी ते झटत होते. कोणी रक्तदान पेढ्या चालवत. कोणी रस्त्यांचे काम सुरळीत व्हावे म्हणून प्रयत्न करीत. कोणी विद्यादान करीत. कोणी अंधांसाठी काँप्युटरचे क्लास चालवी. कोणी सैनिकांसाठी

स्वेटर विणून पाठवीत. तर कोणी खेड्यापाड्यातील वाचकांसाठी विनामूल्य पुस्तके लिहीत.

असे जरी असले, तरी ना कोणी वर्तमानपत्र, न सोशल मिडिया ना टीव्ही – यांच्यावर कोणीच या जाणत्या कार्यकर्त्यांची चर्चा करत नसे. सर्वांना मसालेदार मारामाऱ्या, खून, भ्रष्टाचार यांच्या चर्चेतच रस असे.

सर्वांनाच नाही हं!

जयश्री पटवर्धन या त्याला अपवाद. (आणि ई साहित्यही). समाजात कार्य करणाऱ्या विविध संस्था आणि व्यक्ती यांचे कार्य जगाला कळावे यासाठी जयश्रीताई झटतात. अनेक लेख लिहितात. या लेखांचे संकलन असलेली नऊ पुस्तके आजवर प्रकाशित झाली आहेत.

जाणते आहेत म्हणूनच हे जग चालले आहे. नाहीतर भ्रष्ट आणि दुष्ट राक्षसांनी त्याला कधीच गिळले असते. आपणही जयश्रीताईंसारखा या जाणत्यांचा शोध घ्यायला हवा, त्यांना साथ द्यायला हवी, त्यांचे हात व्हायला हवे... नाही का!

सुनीळ सामंत

अध्यक्ष
ई साहित्य प्रतिष्ठान

अनुक्रमणिका

1. परिमला भट
2. घुमटकर अंध भगिनी
3. अभिजीत माळी
4. प्राजक्ता कोलपकर
5. अनघा हिरे
6. वृषाली जोशी
7. वैद्य सुविनय दामले
8. माधवी कुंटे
9. संकल्प फाउंडेशन, सामनेर 'संवाद सारथी,
10. संवेदना केंद्र
11. सूर्यनमस्कार
12. अवयवदान
13. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केलेली गणेशाची प्रार्थना!
14. श्री समर्थांची करुणाष्टके
15. रेशमी दु:खं!
16. असाही एक दिलासा -
17. चित्ती सदा असे समाधान.
18. गणेश चतुर्थी
19. जनी जाणता पाय त्याचे धरावे.

परिमला भट

परिमलाताई या जन्मांध असूनही अत्यंत कर्तृत्ववान स्त्री आहेत. त्यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी दोन्हीही मुंबईत आहे. अंधत्व ही अडचण आहे, असे त्यांना कधीच वाटले नाही. उलट दृष्टिहीनांचा संघर्ष आणि त्यांच्या गरजा त्यांनी जागतिक पटलावर प्रभावीपणे मांडल्या. जन्मतः अंधत्व पदरी पडूनही त्याचा स्वीकार करून त्यांनी जिद्दीने शिक्षण घेतले.

शासनाच्या एकात्मिक शिक्षण पद्धतीअंतर्गत मुंबईतील डुरेलो कॉन्व्हेंट स्कूलमध्ये त्यांना प्रवेश मिळाला. डोळस मुलांबरोबर ॲडजस्ट करताना अनेक संघर्षात्मक प्रसंगांना सामोरे जावे लागत असे. शारीरिक शिक्षणाचा तास असला की अंध मुलांना वर्गातच बसून राहावे लागे. अशा अनेक मूलभूत आणि आवश्यक गोष्टींपासून त्यांना वंचित राहावे लागले.

सातवीनंतर शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे त्यांना पुन्हा छबीलदास शाळेत प्रवेश घ्यावा लागला आणि इंग्रजी माध्यमातून मराठी माध्यमात शिक्षण घ्यावे लागले. ही त्यांच्यासाठी मोठीच कसरत होती. त्यांनी रायटर्सच्या सहाय्याने दहावीची परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण केली. त्यानंतर बी.ए., एम्.एस्.डब्ल्यू. तसेच व्यवसाय व्यवस्थापनाचा डिप्लोमा यशस्वीरित्या पूर्ण केला. फिल्डवर्कसाठी अधिक सक्षम व्हावे यासाठी त्यांनी आणखी एक डिप्लोमा पूर्ण केला.

अंध मुलांचे प्रश्न त्यांनी जवळून अनुभवले होते. समाज आणि घरसुद्धा अनेकदा या मुलांच्या भावनांना स्थान देत नाही, हे त्यांना प्रकर्षाने जाणवले. त्यामुळे त्यांनी अशा मुलांबरोबर संवाद साधला. प्रसंगी त्यांना समुपदेशन करून योग्य मार्ग दाखवला. काही मुलांना स्वतःच्या पायावर उभे राहणे कळत नसे किंवा जमतही नसे. अशा मुलांना त्या मदत करीत.

ज्या मुलांना उशिरा अंधत्व आले असेल, अशांना व्होकेशनल स्किल शिकवणे, १५ ते १८ वयोगटातील मुलांना शाळा-कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, तसेच अशा मुलांसाठी शासनाच्या कोणत्या योजना आहेत याचा अभ्यास करून त्या योजना पालकांपर्यंत पोहोचवणे, हा त्यांचा अत्यंत कृतीशील प्रयत्न होता.

एम्.एस्.डब्ल्यू. पूर्ण केल्यानंतर त्यांनी अंध मुलांसाठी कार्य करणारी “स्नेहांकित हेल्पलाईन” ही संस्था स्थापन केली. या संस्थेअंतर्गत ब्रेल लिपीत उपलब्ध असलेल्या पुस्तकांचे ऑडिओ बुक्स तयार करण्याचा विक्रम त्यांच्या संस्थेने केला. त्यांच्या ऑडिओ बुक्सना महाराष्ट्रातूनच नव्हे, तर देश-विदेशातूनही मागणी येऊ लागली.

दृष्टिहीन मुलांना प्रशिक्षण, मार्गदर्शन, आत्मसंवर्धन आणि सशक्तीकरण देणे हे “स्नेहांकित हेल्पलाईन”चे प्रमुख उद्दिष्ट होते. करोना काळात “डिजिटल लिटरसी” हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत मदतनीसांच्या माध्यमातून अंध मुलांना कॉम्प्युटर ट्रेनिंग देण्यात आले.

२०१६ मध्ये ब्रेल लिपीतून दहावी, अकरावी-बारावी कला व वाणिज्य शाखेची पुस्तके छापण्यात आली. तसेच अवांतर वाचनासाठी श्री. अच्युत गोडबोले यांसारख्या दिग्गज लेखकांची पुस्तकेही ब्रेल लिपीत उपलब्ध करून देण्यात आली.

"स्नेहांकित"चे विशेष आकर्षण म्हणजे दरवर्षी एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अंध मुलांसाठी आयोजित करण्यात येणारे निवासी शिबिर. या शिबिरामध्ये पोहणे, झुम्बा, मल्लखांब अशा विविध प्रकारचे प्रशिक्षण मुलांना दिले जाते. त्यातून मुलांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होतो तसेच एकमेकांना सांभाळून टीमवर्क करण्याची ऊर्जा त्यांना मिळते.

याशिवाय एकमेकांशी संवाद साधल्यामुळे त्यांच्यातील संवाद कौशल्यातही वाढ होते.

त्यांनी डोंबिवली आणि ठाणे येथेही "स्नेहांकित"च्या दोन शाखा सुरू केल्या आहेत. त्या दोन्ही शाखादेखील उत्तम प्रकारे कार्यरत आहेत. समाजातील प्रत्येकाने अंध व्यक्तींशी संकोच न बाळगता कसे बोलावे, याचेही प्रशिक्षण येथे दिले जाते.

नवीन टेक्नॉलॉजीमुळे विविध ॲप्स आणि ॲक्सेप्टेबल फॉरमॅट्स उपलब्ध झाल्याने अंध व्यक्तींसाठी अनेक सुविधा निर्माण झाल्या आहेत, असे परिमलाताई आवर्जून सांगतात. ऑनलाइन शॉपिंग तसेच विविध ऑनलाइन कार्यक्रमही आता सहज पाहता येतात. त्यामुळे विस्तृत माहिती मिळून आत्मविश्वासाने समाजात वावरता येते.

परिमलाताईंनी एअर इंडियाच्या मेडिकल सेवा विभागात सीनियर मॅनेजर म्हणून तब्बल ३२ वर्षे काम केले. त्याचप्रमाणे राष्ट्रीय दृष्टिहीन संस्था (NAB - भारत) तसेच महिला कल्याण विभाग येथे मानद सचिव म्हणूनही त्यांनी कार्य केले. सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी या पदांवर महत्त्वपूर्ण कामे केली आहेत.

स्विडिश फेडरेशनच्या नेतृत्वाखाली आयोजित नेतृत्व प्रशिक्षणासाठी त्यांनी भारतातील दृष्टिहीन महिलांच्या परिस्थितीवर अहवाल सादर केला. त्या काळातील हे अत्यंत प्रेरणादायी कार्य होते.

परिमलाताईंनी पर्वतारोहणाचा कोर्सही पूर्ण केला असून त्यांनी १४,५०० फूट उंचीपर्यंत चढाई केली आहे. त्यांचे हे विलक्षण साहस खरोखरच प्रेरणादायी आहे.

शिक्षण विषयक जागतिक परिषद, जर्मनी तसेच पाकिस्तानातील कराची येथे दृष्टिहीनांच्या हक्कांसंदर्भातील बैठकींमध्येही त्यांनी सहभाग घेतला आहे. त्या केवळ भारतीय दृष्टिहीन महिलांचे प्रतिनिधित्व करत नाहीत, तर एका विशिष्ट सामाजिक हेतूने प्रेरित होऊन हे कार्य करीत आहेत.

अंध व्यक्तींना नोकरीच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होतात. तसेच पर्यटनासाठीही त्यांना मर्यादित सुविधा मिळतात, याची परिमलाताईंना खंत वाटते. अशा व्यक्तींसाठी उपयुक्त वेबसाईट्स उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांची संस्था प्रयत्नशील आहे. तसेच संस्थेच्या भविष्यातील योजनांमध्ये भाडेतत्त्वावर जागा मिळविण्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

परिमलाताईंना आजपर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. नोकरी, संस्थेचे कार्य आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांना त्यांच्या दोन मुली आणि पतीची उत्तम साथ लाभली आहे.

कितीही संकटे आली, तरी वाचन, ट्रेकिंग, प्रवास, गाणी ऐकणे आणि मैत्री जोडणे हे त्यांचे छंद आणि आवडी आजही कायम आहेत.

त्यांचा आत्मविश्वास आणि हिरिरीने काम करण्याची वृत्ती या सर्व गोष्टी दृष्टी असणाऱ्यांनाही प्रेरणा देणाऱ्या आहेत. आमचे बाह्यचक्षू उघडे आहेत; परंतु त्यांचे अंतःचक्षू जागृत असल्यामुळेच त्या इतके उत्तम कार्य करू शकत आहेत. त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!

स्मिताताई चव्हाण या पुण्यात राहतात. त्या देखील अंध व्यक्तींसाठी शक्य तेवढे कार्य करतात. त्यांच्यामुळेच मला आदरणीय परिमलाताईंच्या कार्याची ओळख झाली आणि वाचकांनाही ती व्हावी, या हेतूने हा लेखप्रपंच.

परिमला भट -
संपर्क - 9987114680
स्नेहांकित हेल्पलाईन

घुमटकर अंध भगिनी

दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी सावली सोशल केअर सेंटर, कोल्हापूर येथे डॉ. अमिधा घुमटकर, समिधा घुमटकर या दोन जन्मांध महिलांना तसेच त्यांच्या आईला विशेष निमंत्रित म्हणून बोलावण्यात आले होते.

या विशेष कार्यक्रमासाठी श्री. देशपांडे सरांनी मलाही आमंत्रित केले होते. मी माझ्या मैत्रिणीसह आवर्जून या कार्यक्रमाला उपस्थित राहिले.

या दोघी बहिणी आणि त्यांची आई या अत्यंत प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाच्या आहेत. कार्यक्रमादरम्यान देशपांडे सरांनी त्यांना विविध प्रश्न विचारून बोलते केले.

हे कुटुंब मुंबईचे आहे. या मुलींच्या आई एम.ए. झालेल्या आहेत. शिवाय त्यांनी एका कंपनीच्या ऑडिट विभागात नोकरीही केली होती.

जेव्हा त्यांच्या मुलीचा जन्म झाला, तेव्हा ती अंध असेल असे त्यांना अजिबात वाटले नाही. योगायोगाने त्यांच्या बहिणीलाही त्याच काळात मुलगी झाली होती. तिने आपल्या मुलीसमोर टाळी वाजवली, तर ती लगेच त्या दिशेने पाहू लागली. मात्र यांच्या मुलीचे डोळे फक्त इकडे-तिकडे फिरत होते. त्यामुळे मुलीच्या दृष्टीमध्ये काहीतरी समस्या असल्याची जाणीव त्यांना झाली.

यानंतर मुलीला घेऊन आई-वडील डोळ्यांच्या डॉक्टरांकडे गेले. डॉक्टरांनी सर्व तपासण्या केल्या आणि म्हणाले, “सॉरी ताई, पण तुमची मुलगी दृष्टिहीन आहे.” हे ऐकताच क्षणभर त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. दवाखाना माडीवर होता. खाली आल्यावर त्या आपल्या

यजमानांना म्हणाल्या, “काहीतरी उपाय निघेल.” पण मुलीचे वडील अतिशय हळवे होते. आपली मुलगी दृष्टिहीन आहे, हा धक्का त्यांना फार मोठा होता.

डॉ. अमिधा लहानपणापासूनच शाळेत जाण्याचा हट्ट करीत. शेजारच्या घरी गेल्यावर तेथील मुलगा शाळेत जात असल्यामुळे त्या त्याच्याजवळ बसत आणि तो काय वाचतो, हे उत्सुकतेने ऐकत. आईच्या लक्षात आले की, मुलगी आपल्या अपेक्षेपेक्षाही अधिक तीव्र बुद्धिमत्ता असलेली आहे. त्यामुळे आईला अधिकच उत्साह आला.

मावस भाऊ-बहीण सिनेमाला जात असत, पण या दोघींना जाता येत नसे. मात्र त्यांचे वडील त्यांना आवर्जून चांगली नाटके पाहायला घेऊन जात. मुलींनी दंगामस्ती केली, तरी त्यांना मारायचे नाही, हा वडिलांचा कटाक्ष होता. समिधा लहानपणी खूप खोडकर होत्या. आई प्रेमळ असल्या, तरी गरजेच्या वेळी धाकही दाखवत असत.

इमारतीतील इतर मुले खाली खेळत असत; मात्र या दोघींना खेळात सामावून घेत नसत. तेव्हा वडिलांनी त्यांना पत्ते, कॅरम असे खेळ आणून दिले आणि स्वतः त्यांना ते खेळ शिकवले.

बालवाडीत प्रवेश घेण्याची वेळ आल्यावर त्यांनी मुलींना डोळस मुलांच्या शाळेतच घालण्याचा निश्चय केला. डोळस मुलांबरोबर राहिल्याने मुली अधिक चांगल्या प्रकारे शिकतील, असे त्यांना वाटत होते. मात्र डोळस मुलांच्या शाळेत प्रवेश घेताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. मोठ्या झाल्यानंतरही अशाच प्रकारचे काही कटू अनुभव त्यांना आले.

पहिली काही वर्षे आई स्वतःच मुलींचा अभ्यास घेत असत. डॉ. सुमेधा यांना वाटायचे की, आईवर हा ताण पडू नये. त्यामुळे त्यांनी रीडर आणि रायटर शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र काही वेळा ऐन परीक्षेच्या वेळीही रायटर काही कारण सांगून येत नसे. अशा वेळी दुसरा रायटर शोधणे अत्यंत कठीण ठरायचे.

पण या सर्व अडचणींवर मात करून डॉ. सुमेधा आणि अमिधा यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी फ्रेंच, जर्मन, फारसी, बंगाली यांसारख्या विविध भाषा शिकल्या. या भाषा शिकताना रीडरची उणीव प्रकर्षाने जाणवत असे. तरीही त्यांनी सर्व अडचणींवर मात करत एम.ए., पीएच.डी. अशा पदव्या उत्कृष्ट गुणवत्तेसह मिळवल्या.

प्राध्यापक होण्यासाठी त्यांनी सेट आणि नेटच्या परीक्षाही दिल्या. मात्र अंधत्वाचे कारण पुढे करून त्यांना अनेक ठिकाणी नोकऱ्या नाकारण्यात आल्या. अपंगांसाठी राखीव असलेल्या तीन टक्के जागा कार्यान्वित करण्यासाठी एका अपंग व्यक्तीने न्यायालयात धाव घेतली. तो खटला जिंकल्यानंतर महाविद्यालयांवर अपंगांना नोकरी देण्याचे बंधन आले आणि त्यानंतर अमिधा यांना साठये महाविद्यालयात इतिहासाच्या सहाय्यक प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली.

तेथे त्यांनी संस्कृत आणि फ्रेंच विषयांच्या शिकवण्या घेऊन अर्थार्जनही केले. अमिधा या बहुभाषातज्ज्ञ आहेत. मराठी, हिंदी, इंग्रजी, फारसी, उर्दू, फ्रेंच, जर्मन आणि बंगाली या भाषा त्या अस्खलितपणे बोलतात. शिवाय संस्कृत आणि सिंधी भाषेचेही त्यांना ज्ञान आहे.

कॉम्प्युटर आणि मोबाईलचा वापर त्या अत्यंत सराईतपणे करतात. याशिवाय त्यांनी गांधर्व महाविद्यालयाच्या संगीताच्या परीक्षाही दिल्या असून त्यांना संगीताची उत्तम जाण आहे.

डॉ. अमिधा यांनी जवळजवळ वीस वर्षे महाराष्ट्रातील विज्ञानाच्या वाढीचा इतिहास या विषयावर मूलगामी संशोधन केले आणि अनेक नवी माहिती प्रकाशात आणली. एम.फिल.साठी त्यांनी एकोणिसाव्या शतकातील विज्ञानप्रसारक कोल्हापूरचे श्री. बाळाजी प्रभाकर मोडक यांच्यावर संशोधन केले. मोडक यांनी केलेल्या प्रचंड कार्यावर प्रबंध लिहून अमिधा यांनी त्यांना इतिहासात योग्य स्थान मिळवून दिले. मुंबई विद्यापीठाच्या इतिहासाच्या एम.ए. अभ्यासक्रमात प्रा. मोडक यांचा अंतर्भाव करण्यात आला.

डॉ. अमिधा यांनी अनेक शोधनिबंध लिहिले आहेत. भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये महाराष्ट्रातील विज्ञानाच्या इतिहासावर त्यांनी व्याख्याने दिली आहेत. ग्लासगो येथे झालेल्या युरोपियन सोशल सायन्स अँड हिस्टरी कॉन्फरन्समध्ये त्यांनी सादर केलेला शोध निबंध विशेष गाजला. हा निबंध श्री. र. धो. कर्वे यांच्या कार्यावर आधारित होता.

साठये महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत झाल्यानंतर त्यांनी अनेक नवे उपक्रम सुरू केले. विद्यार्थ्यांना शोधनिबंध लेखनाकडे प्रवृत्त केले, त्यासाठी त्यांची तयारी करून घेतली आणि अनेक स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले.

डॉ. अमिधा २०१४ मध्ये इतिहास विभागाच्या प्रमुख झाल्या. अशा प्रकारे त्यांचे कार्य अखंडपणे सुरू आहे. आपल्या उणिवेवर मात करून त्यांनी घेतलेली भरारी थक्क करणारी आणि सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

त्यांची धाकटी बहीण समिधा घुमटकर या एस.एन.डी.टी. विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. जन्मतः दृष्टिहीन असूनही त्या सकाळी उठल्यापासून स्वयंपाकासह घरातील सर्व कामे करतात आणि लोकल ट्रेनने प्रवास करून आपल्या कार्यालयात पोहोचतात.

त्यांनी कॉम्प्युटर प्रोग्रामिंगसह अनेक गोष्टी शिकल्या आहेत. कॉलेजला जाताना त्या ट्रेनने आणि परतताना बसने प्रवास करीत. त्या हार्मोनियम अतिशय सुंदर वाजवतात.

त्यांच्या आजीच्या विवाहाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित समारंभात कोणीतरी आजींना टेपरेकॉर्डर भेट दिला होता. समिधा सांगतात, “तो आम्हीच जास्त वापरला. गाणी आणि इतर गोष्टी रेकॉर्ड करता येतात, हे नवीन तंत्रज्ञान आम्हाला त्यातून समजले.”

पुढे मोबाईल आल्यानंतर रेकॉर्डिंग करणे, डाउनलोड करणे या गोष्टीही त्यांनी आत्मसात केल्या.

या दोघींनाही समाजाला हे दाखवून द्यायचे होते की, “आम्ही अंध असलो, तरी कुठेही कमी नाही.”

त्यांच्या आईने दाखवलेली जिद्द, मुलींना कधीही कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू न देण्यासाठी घेतलेली काळजी आणि गरज पडेल तेव्हा स्वतः रीडर म्हणून केलेली मदत — या सर्व गोष्टी अत्यंत अभिमानास्पद आहेत.

अभिजीत माळी

अभिजीत माळी हे मूळचे आटपाडीचे आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण तेथेच झाले. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते जवळच असलेल्या खवासपूर या गावात गेले. आटपाडीपासून सुमारे पंधरा किलोमीटर अंतरावर असलेल्या या गावात श्री. भोसले यांची कुस्तीसाठी व्यायामशाळा होती. अभिजीत यांना लहानपणापासूनच कुस्तीची खूप आवड होती. त्यामुळे शिक्षणाबरोबरच त्यांनी येथे कुस्तीचाही सराव सुरू केला.

खवासपूर येथे राहून त्यांनी उर्वरित शालेय शिक्षण घेतले. स्वतःचा स्वयंपाकही ते स्वतःच बनवायचे. तेथे त्यांनी तब्बल तीन वर्षे कुस्तीची प्रॅक्टिस केली. त्यानंतर ते पुन्हा आटपाडीला आले आणि हायस्कूलचे उर्वरित शिक्षण तसेच कॉलेजचे शिक्षणही त्यांनी तेथेच पूर्ण केले. त्यांनी फिजिक्स विषय घेऊन बी.एस्सी.ची पदवी प्राप्त केली.

अकरावी-बारावीमध्ये शिकत असतानाच त्यांनी कुस्तीमध्ये राज्यस्तरीय प्राविण्य मिळवले होते. पुढे शिक्षणासोबत कुस्तीही सुरू ठेवायची होती. त्यामुळे त्यांनी फिजिकल ट्रेनिंग हा कोर्स निवडला आणि मिरज येथील कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. तेथे गेल्यानंतर त्यांना जवळच एक तालीम व कुस्ती केंद्र असल्याचे समजले. मग ते कुस्तीतील पुढील प्रशिक्षण आणि सरावासाठी त्या केंद्रात जाऊ लागले. रोज दोन तास ते कुस्तीचा सराव करायचे.

त्या ठिकाणी आंतरमहाविद्यालयीन कुस्ती स्पर्धा आयोजित केल्या जात असत. अभिजीत त्यामध्ये उत्साहाने सहभागी होत आणि त्यांनी त्या

स्पर्धांमध्येही उल्लेखनीय प्राविण्य मिळवले. याच कामगिरीच्या जोरावर त्यांची ऑल इंडिया इंटर कॉलेज स्पर्धेसाठी निवड झाली. त्यासाठी ते मेरठ येथे गेले. मात्र, त्या स्पर्धेत त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही आणि ते पुन्हा मिरजेला परतले.

दरम्यान, त्यांची बी.पी.एड.ची परीक्षा जवळ आली होती. फिजिकल परीक्षा पूर्ण झाली होती आणि लेखी परीक्षेला अजून थोडा अवकाश होता. याच काळात त्यांच्या धाकट्या बहिणीचे लग्न ठरले. लग्नासाठी ते आटपाडीला आले होते. त्यांची दुसरी बहीण कराड येथील गव्हर्नमेंट कॉलेजमध्ये शिक्षण घेत होती. तीही लग्नासाठी आटपाडी बसस्थानकावर आली होती. तिला घेण्यासाठी अभिजीत मोटरसायकलवरून निघाले.

त्यांचा लहान पुतण्या, "मीसुद्धा तुमच्यासोबत येणार," असा हट्ट करू लागला. त्यामुळे त्यालाही सोबत घेऊन अभिजीत मोटरसायकलवरून निघाले. मात्र, जात असताना अचानक गाडीवरील नियंत्रण सुटले आणि अभिजीत व त्यांचा पुतण्या दोघेही खाली पडले. पुतण्या रस्त्याच्या एका बाजूला पडला, तर अभिजीत रस्त्याच्या मधोमध पडले. दुर्दैवाने ते थेट मानेवर पडल्यामुळे त्यांच्या स्पायनल कॉर्डला गंभीर दुखापत झाली.

मणक्याला जबरदस्त दुखापत झाल्यामुळे त्यांच्या हातापायांची हालचाल पूर्णपणे बंद झाली. त्यांना तातडीने सांगली येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे दोन दिवस उपचार झाले; मात्र विशेष सुधारणा न झाल्याने त्यांना पुढील उपचारासाठी पुण्यातील हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. सर्व तपासणीनंतर डॉक्टरांनी सांगितले की, अभिजीत यांच्या मणक्याचे ऑपरेशन करावे लागेल.

१६ एप्रिल २०१४ हा तो दिवस. त्याच दिवशी ऑपरेशन करण्याचे ठरले. त्यांचे वडील आणि चुलत भाऊ हॉस्पिटलमध्येच थांबले होते.

त्याच दिवशी तिकडे बहिणीचे लग्न सुरू होते. वडील मोबाईलवरून मंगलाष्टके ऐकत होते आणि याचवेळी अभिजीत यांच्या मणक्याचे ऑपरेशन सुरू होते. ऑपरेशननंतर तब्बल नऊ तासांनी त्यांना शुद्ध आली. त्यानंतर काही दिवस त्यांना हॉस्पिटलमध्येच राहावे लागले. पुढे त्याच हॉस्पिटलमध्ये त्यांची फिजिओथेरपी सुरू झाली; मात्र त्याला अपेक्षित यश मिळत नव्हते. अखेर डॉक्टरांनी सांगितले की, "यांच्या हातापायांच्या हालचालींमध्ये विशेष सुधारणा होईल असे दिसत नाही. त्यामुळे त्यांना घरी घेऊन जा आणि घरीच काळजी घ्या."

ते घरी आले. त्यांच्या शरीरावर इतर ठिकाणीही जखमा होत्या. त्या सर्व जखमा बऱ्या होण्यासाठी जवळपास दीड महिना लागला. यानंतर अभिजीत यांच्या मनात विचार आला की, "देवाने जर मला अशाच अवस्थेत ठेवायचे ठरवले असेल, तर आपण आहे त्या परिस्थितीत काहीतरी केलेच पाहिजे."

यानंतर ते 'न्यूरोस्पाईन' या हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. तेथे विविध प्रकारच्या फिजिओथेरपीमुळे त्यांच्या हातापायांत थोडीथोडकी ताकद यायला लागली. ते हात उचलू लागले. मसाज, पंचकर्म यांसारखे उपचारही झाले. मात्र, एकंदरीत फारशी सुधारणा होत नव्हती.

तेव्हा कोणीतरी त्यांना सांगितले की, चंदीगडमध्ये एक विशेष सेंटर आहे. तेथे उपचारासाठी जावे. मग अभिजीत आई-वडिलांसोबत चंदीगडला गेले. तेथे त्यांनी दीड महिना उपचार घेतले. त्या सेंटरमध्ये त्यांना व्हीलचेअरवर

कसे बसायचे, रिहॅबिलिटेशन कसे करायचे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कसे जायचे अशा अनेक गोष्टी शिकवल्या गेल्या.

दीड महिन्यानंतर अभिजीत पुन्हा घरी आले. चंदीगडच्या सेंटरमध्ये ज्या ज्या गोष्टी शिकवल्या गेल्या होत्या, त्या सर्व गोष्टी त्यांनी आटपाडीत नियमितपणे सुरू ठेवल्या. दिवसभर ते काही ना काही व्यायाम करायचे आणि इतर वेळी मोबाईल वापरायचे. दुसरा पर्यायच नव्हता.

अचानक एके दिवशी त्यांना 'माया केअर फाउंडेशन'कडून एक मेसेज आला. या फाउंडेशनमार्फत दिव्यांग व्यक्तींना काम दिले जात होते. त्यांनी आपला सीव्ही त्या संस्थेकडे पाठवला आणि अभिजीत यांची नोकरीसाठी निवड झाली. सौ. मंजिरी गोखले या त्या फाउंडेशनच्या संस्थापिका आहेत. त्यांनीच अभिजीत यांची मुलाखत घेतली.

अभिजीत तोंडात पेन धरून मोबाईल चालवत असत. त्यांच्या हाताच्या बोटांत शक्ती नव्हती. त्यांनी एक विशेष प्रकारचा पेन पाहिला होता आणि तसाच पेन घरात तयार करून घेतला होता. तो पेन तोंडात धरून ते मोबाईलवर टायपिंग करायचे.

'माया केअर फाउंडेशन' ही संस्था वृद्धांसाठी काम करते. ज्या वृद्धांना काही कामासाठी बाहेर जायचे असेल, त्यांच्यासाठी या फाउंडेशनचा प्रतिनिधी घरी जाऊन ओळखपत्र दाखवतो आणि त्यांना रिक्षासारख्या वाहनातून बाहेर घेऊन जातो. त्यांना फळे, बिस्किटे किंवा इतर आवश्यक वस्तू खरेदी करायच्या असतील, तर त्या ठिकाणी नेतो आणि सुरक्षितपणे पुन्हा घरी आणून सोडतो.

हे काम करण्यासाठी स्वयंसेवक शोधावे लागत असत. अभिजीत हे काम घरबसल्या करू लागले. रोज विविध व्यक्तींशी या कामासंदर्भात त्यांचे बोलणे व्हायचे. नवीन ओळखी निर्माण झाल्या. या संस्थेत इतरही दिव्यांग व्यक्ती होत्या. त्यांच्याशीही अभिजीत यांची मैत्री झाली.

अभिजीत सांगतात, "माझा पहिला पगार पंधरा हजार रुपये माझ्या अकाउंटवर जमा झाला. तो आनंद अवर्णनीय होता. माझ्या या अपंग अवस्थेतही मी पैसे कमवू शकतो, याचे खूप आश्चर्य वाटले. त्यानंतर मी माझ्या कामावर पूर्ण लक्ष केंद्रित करू लागलो. पुढे मला वीस हजार रुपये पगार मिळू लागला. माझ्या कमाईतून मी अनेकांना भेटवस्तू देऊ लागलो. माझा एकलकोंडेपणा खूप कमी झाला. कामामुळे मी उत्साही राहू लागलो."

ते पुढे सांगतात, "मला आता बाहेरही जाता येऊ लागले. माझ्या व्हीलचेअरवरून मी घराबाहेर थांबायचो आणि तेथून मला गाडीत बसवले जायचे." अभिजीत यांचा हा आनंद खरोखरच गगनात मावेनासा झाला होता.

त्यांचे अपंगत्व इतके गंभीर आहे की, त्यांना लघवीसाठी पाईप आणि शौचासाठी डायपरचा वापर करावा लागतो. त्यांनी स्वतःसाठी एक इलेक्ट्रिक व्हीलचेअरही घेतली आहे. घरात ते व्हीलचेअरवरून सहज फिरू शकतात. त्यांनी 'माया केअर फाउंडेशन'चे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

श्री. अभिजीत यांची ही कहाणी ऐकून मन भरून येते. एखाद्याच्या आयुष्यात केव्हा काय घडेल, याचा काही नेम नसतो. मात्र, फिनिक्स

पक्ष्याप्रमाणे अभिजीत यांनी सर्व संकटांवर मात करून पुन्हा नव्या उमेदीने भरारी घेतली आहे. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

एक विशेष माहिती म्हणून सांगावेसे वाटते की, मी लिहिलेल्या 'प्रेरक व्यक्तिमत्त्वे' या पुस्तकात 'माया केअर फाउंडेशन'वर स्वतंत्र लेख लिहिला आहे. वाचकांनी तो अवश्य वाचावा.

अभिजीत माळी

संपर्क - 9503087880

आटपाडी

प्राजक्ता कोलपकर

प्राजक्ता या प्रा. फाउंडेशनच्या संस्थापिका आहेत. त्या चंद्रपूरच्या आहेत. त्यांच्या आजूबाजूला नक्षलवादी वातावरण होते. त्यांचे सर्व शिक्षण चंद्रपूरलाच झाले. त्या उत्तम चित्रकार, लेखिका व अभिनयकुशल आहेत. त्यांनी नाटकांमध्येही काम केले आहे. जीवनात काहीतरी वेगळे करावे, असे त्यांना सतत वाटायचे.

त्यांचे मित्र त्यांना म्हणायचे, "तू पुण्याला जा. तुला तेथे काम करण्यासाठी काहीतरी वेगळे क्षेत्र मिळेल." आईला मात्र वाटायचे की, आता तिचे लग्न करून टाकावे. पण प्राजक्ता आईला म्हणायच्या, "मला एक संधी दे. त्यात जर मी यशस्वी झाले नाही, तर तू सांगशील ते नक्की करेन."

त्यांचा एक मित्र पुण्यात होता. तो फोटोग्राफर होता. प्राजक्ता एका टेम्पो ट्रॅव्हलरमधून पुण्याला, शिवाजीनगरपर्यंत गेल्या. त्यावेळी लँडलाईन फोनचा काळ होता. शिवाजीनगर बसस्टॉपवरून त्यांनी त्या मित्राला अनेक फोन केले. बराच वेळ फोन केल्यानंतर त्याने फोन उचलला व म्हणाला, "तू पुण्याला आलीस खरी, पण राहणार कुठे? कारण मी कॉट-बेसिसवर राहतो."

हे ऐकून प्राजक्ताला रडूच कोसळले. त्या मित्राचा आणखी एक मित्र होता. त्याच्याकडे तो प्राजक्ताला घेऊन गेला. त्याच्या फ्लॅटमध्ये सर्वत्र अस्ताव्यस्त पसारा पडलेला होता. प्राजक्ताने कसेबसे आपले सामान तेथे ठेवले व फ्रेश होऊन त्या मित्राबरोबर एका कंपनीत गेल्या.

तेथील बॉसला त्यांनी स्वतः तयार केलेली ग्रीटिंग्ज व चित्रे दाखवली. मालकांनी त्यांना नोकरी देण्याचे ठरवले. “पगार किती हवा?” असा प्रश्न त्यांनी केला. किती पगार सांगावा, याची प्राजक्ताला कल्पनाच नव्हती. शेवटी मालकच म्हणाले, “मी तुला महिन्याला ७००० रुपये देतो.”

राहायचे कुठे, हा प्रश्न अजूनही होताच. मित्राच्या ओळखीमुळे त्यांना एका कुटुंबाकडे पेईंग गेस्ट म्हणून राहायला मिळाले. ते कुटुंब अतिशय प्रेमळ होते.

आईचा आग्रह मात्र सुरूच होता — “आता तुझे लग्न करायलाच हवे. आपण तुला पुण्यातलाच मुलगा पाहू.” अखेर आई-वडील पुण्यात येऊन दाखल झाले. त्यांनी चार-पाच मुलगे पाहिले.

त्यांपैकी एक मुलगा आपल्या आई-वडिलांसोबत प्राजक्ताला भेटायला आला होता. तो Sakal मध्ये मुख्य वार्ताहर म्हणून कार्यरत होता. पत्रकारिता आणि लेखन हा विषय प्राजक्तालाही आवडीचा असल्यामुळे दोघांमध्ये भरपूर गप्पा रंगल्या. विचार जुळले आणि दोघांनीही एकमेकांना पसंती दिली.

विवाहानंतर प्राजक्ता कोलपकरांच्या घरी आल्या आणि त्या पुणेकर झाल्या. त्यांचे कामही जोमाने सुरू होते. विवाहाला सात-आठ महिने झाले आणि त्यांना दिवस गेले. ही आनंदाची बातमी ऐकून उभयतांनाही खूप आनंद झाला.

प्राजक्ताने तर बाळाच्या आगमनापूर्वी घर आणि खोली अतिशय सुंदर सजवली होती. त्यांनी दोन कविता लिहून भिंतीवरही लावल्या होत्या. परंतु पाणी कमी झाल्यामुळे प्रसूती नियोजित वेळेच्या काही दिवस आधीच

करावी लागली. त्यांना मुलगा झाला. मात्र दुर्दैव असे की, बाळ केवळ पाच दिवसांचे असतानाच हे जग सोडून गेले.

ईश्वरी इच्छेपुढे कोणाचाच इलाज चालत नाही, हेच खरे. या दुःखातून सावरण्यासाठी प्राजक्ताला काही काळ लागला. आई होण्याचे सुख लाभले नाही, ही खंत त्यांच्या मनात होती. मात्र काही वर्षांनी त्यांना कन्यारत्न प्राप्त झाले. तीच गार्गी होय.

पहिल्या आघातानंतर यावेळी प्राजक्ता सतत गार्गीबरोबर राहू लागल्या. गार्गीसाठी त्यांनी स्वतःच पाळणाघर सुरू केले. गार्गीला घरी सोडून बाहेर कामाला जाणे त्यांना पसंत नव्हते. मात्र तिच्या मित्र-मैत्रिणींना वाटायचे की, प्राजक्तासारख्या हुशार आणि कलावंत व्यक्तीने पाळणाघर का चालवावे?

पण प्राजक्ताने विचार केला की, गार्गीला उत्तम बालपण मिळावे आणि स्वतःलाही मुलीच्या बालपणातील गमती-जमती अनुभवता याव्यात. पाळणाघरामुळे नोकरी करणाऱ्या महिलांचीही मोठी सोय झाली. पाळणाघर उत्तम सुरू होते; तरीही प्राजक्ताच्या मनाला समाधान मिळत नव्हते. "सर्वसामान्य मुलांसाठी मी पाळणाघर चालवते आहे, पण यात विशेष असे काय?" हा प्रश्न त्यांना सतावत होता.

मग त्यांनी निर्णय घेतला की, याबरोबरच विशेष मुलांसाठीही पाळणाघर सुरू करायचे. "माझे मूल असे असते, तर मी काय केले असते?" हा विचार त्यांच्या मनात सतत येत राहिला.

एकदा त्यांच्या पाळणाघरात एक छोटा मुलगा आला. तो पूर्णपणे अंथरुणाला खिळलेला होता. त्याला फारसे काही समजत नव्हते.

दिवसातून त्याला सोळा गोळ्या द्याव्या लागत. तो पाळणाघरात असेपर्यंत त्याला आठ गोळ्या द्याव्या लागत असत. एखादी गोळी जरी चुकली, तरी त्याचा त्या मुलावर गंभीर परिणाम होत असे.

त्या मुलाची आई रोज देवासमोर बसून तीन तास जप करायची. हे समजल्यावर प्राजक्ता तिला म्हणाल्या, "अहो, नुसता जप करून तुमचा मुलगा बरा होणार आहे का? त्यापेक्षा त्याच्यासाठी काहीतरी प्रयत्न करा." त्या हे थोड्याशा रागातच बोलल्या होत्या.

हे ऐकून त्या मुलाची आई शांतपणे म्हणाली, "ताई, माझा मुलगा बरा व्हावा म्हणून मी देवाकडे प्रार्थना करत नाही. त्याला या यातनांतून मुक्ती मिळावी, त्याला मरण यावे, एवढेच मागते."

हे उत्तर ऐकून प्राजक्ता अक्षरशः कोसळल्या. स्वतःचे बाळ गेल्यानंतरही त्या इतक्या रडल्या नसतील, तेवढ्या त्या त्या आईचे शब्द ऐकून रडल्या.

प्राजक्ता म्हणतात, "समाज प्रत्येक परिस्थितीत आईलाच दोष देतो. मूल जन्मत:च मृत झाले, तरी आई दोषी; दिव्यांग मूल जन्माला आले, तरी आई दोषी; आणि मूल झाले नाही, तरीही आईलाच दोष."

हे सर्व पाहून प्राजक्तांनी मनोमन ठरवले की, आता स्पेशल मुलांच्या आयांसाठीच काम करायचे. या मुलांच्या आयांना स्वतःचे आयुष्य जगता येत नाही. त्यांना स्वतःचे छंद जोपासता येत नाहीत. मौजमजा तर त्यांच्या आयुष्यातून पूर्णपणे हरवून जाते.

त्यामुळे त्यांनी सर्वसामान्य मुलांचे पाळणाघर बंद करून केवळ दिव्यांग मुलांसाठीच पाळणाघर चालवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे त्यांना स्वतःचे ध्येय सापडले आणि त्यातूनच त्यांना खरा आनंद मिळाला.

सर्वसामान्य मुलांच्या पाळणाघरात सुमारे साठ मुले होती. त्या सर्व मुलांच्या पालकांशी त्यांनी हळूहळू संवाद साधला आणि सांगितले की, "मी हे पाळणाघर बंद करत आहे." काही पालक नाराज झाले, पण दोन्ही पाळणाघरे दीर्घकाळ चालवणे शक्य नव्हते.

यानंतर प्राजक्तांनी विशेष मुलांसाठी पाळणाघर सुरू केले. मात्र या मुलांच्या आया आपल्या मुलांना नियमितपणे पाठवत नसत. विविध कारणे सांगत असत. पण प्राजक्तांनी ठरवले की, या आयांना घरी जाऊन भेटायचे आणि त्यांची मानसिकता तयार करायची. त्या त्यांना समजावून सांगत, "तुमच्या मुलांना माझ्या सेंटरमध्ये पाठवा. त्यामुळे तुम्हाला स्वतःसाठी थोडा मोकळा वेळ मिळेल. मी या मुलांना सांभाळेन."

अशा प्रकारे प्राजक्ता विशेष मुलांना सांभाळण्याबरोबरच त्यांच्या आयांच्या आयुष्यासाठीही काम करू लागल्या. या आयांचे जीवन उध्वस्त होऊ नये, हीच त्यांची खरी तळमळ होती.

या विशेष मुलांसाठी त्यांनी अनेक थेरपी स्वतः विकसित केल्या आणि त्यांचा उपयोग मुलांच्या विकासासाठी करू लागल्या. हायपर असलेली मुलेदेखील हळूहळू शांत होऊ लागली. त्या मुलांना विविध कौशल्यांची कामे शिकवू लागल्या. त्याशिवाय त्या मुलांना बागेत घेऊन जात आणि अनेक उपयुक्त गोष्टी शिकवत असत.

एका दिवाळीत त्यांच्या सेंटरला दोन लाख पणत्यांची ऑर्डर मिळाली. दिवस-रात्र मेहनत करून मुलांनी ती पूर्ण केली. हा प्रसंग त्या आनंदाने सांगतात.

या मुलांपैकी काहींमध्ये एखादा विशेष गुण दिसून येत असे. तो गुण विकसित व्हावा यासाठी त्या सातत्याने प्रयत्न करत.

प्राजक्ता स्वतः उत्तम चित्रकार, लेखिका, कवयित्री आणि अभिनयकुशल असूनही त्यांनी स्वतःच्या कलाक्षेत्राला मागे ठेवले आणि पूर्णपणे विशेष मुलांसाठी काम करण्याला वाहून घेतले.

अनघा हिरे

श्रीमती अनघा या विवाह करून हिरे यांच्या घरी आल्या आणि आपल्या पुढील जीवनात हिऱ्यासारख्याच चमकल्या. त्यांच्या कर्तृत्वालाही हिऱ्यासारखेच मूल्य आहे. विवाहापूर्वी त्या एम.ए. झालेल्या होत्या. मात्र, कुठल्याही अर्थार्जनासाठी त्यांनी शिक्षणाचा उपयोग केला नाही; तर सर्वसामान्य गृहिणीप्रमाणे संसार सांभाळला. त्यांनी दोन गोड मुलींना जन्म दिला.

त्यांचे यजमान सिव्हिल इंजिनिअर होते. जमिनीचे मोजमाप करण्याचा त्यांचा व्यवसाय होता. ते आणि त्यांची टीम साइटवर जाऊन जागेचे मोजमाप करायचे व नंतर ऑटोकॅडवर त्याचे ड्रॉइंग तयार व्हायचे. नवऱ्याच्या व्यवसायाबद्दल अनघांना एवढीच माहिती होती. दोन मुली, नवरा, नातेवाईक आणि मैत्रिणी यांच्या सहवासात त्या पूर्णपणे रमून गेल्या होत्या.

अशा प्रकारे संसाराची बावीस वर्षे सुरळीतपणे चालू होती. मात्र अचानक दुर्दैवाचा घाला आला आणि त्यांच्या नवऱ्याचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. अनघा अक्षरशः कोलमडून पडल्या. पुढील पंधरा दिवस सर्व विधीकार्य करण्यातच गेले. आलेले नातेवाईक विधीकार्य आटोपून आपापल्या घरी परतले.

या पंधरा दिवसांत अनघांनी स्वतःला खूप सावरले. “दोन मुली आणि आपण — हा तिघांचा संसार पुढे चालायलाच हवा,” असा त्यांनी मनाशी निश्चय केला. नवरा करत असलेला व्यवसाय त्यांच्या

सहकाऱ्यांकडून समजून घ्यायचा आणि तोच व्यवसाय पुढे चालू ठेवायचा, असे त्यांनी ठरवले.

आपल्या या प्रवासाबद्दल अनघा सांगतात की, पतीच्या अचानक निधनामुळे त्यांची बँकेतील खाती सील झाली होती. इन्शुरन्सचे पैसे मिळण्यासाठी वेळ लागणार होता. स्वतःजवळ हजार-पंधराशे रुपयांपेक्षा अधिक पैसे नव्हते. मोठी मुलगी म्हणाली, "आई, काळजी करू नकोस. माझे इंजिनिअरिंगचे शेवटचे वर्ष आहे. ते पूर्ण झाले की मी नोकरी करेन."

पण अनघांना हे मान्य झाले नाही. मुलीने B.E. पूर्ण केल्यानंतर मास्टर्स डिग्री करावी आणि तिला चांगल्या पगाराची नोकरी मिळावी, हीच त्यांची मनापासून इच्छा होती.

शेवटी पतीच्या निधनाचे दुःख बाजूला ठेवून अठराव्या दिवशी त्या पतीच्या ऑफिसमध्ये गेल्या. त्यावेळी ऑफिसमध्ये सात-आठ मुले कामाला होती. त्यांचा पगार देणेही आवश्यक होते. मात्र, अनघाताईंनी त्यांना विश्वास दिला, "माझ्यावर विश्वास ठेवा. मी तुमचे पैसे हळूहळू देईन." त्यावर ती मुले म्हणाली, "मॅडम, असू द्या. आम्ही सर्वजण तुम्हाला सहकार्य करू. तुम्ही ऑफिसमध्ये येत जा आणि व्यवसाय सांभाळा."

त्यानंतर ताईंनी कामामध्ये मन गुंतवायला सुरुवात केली. त्यांच्या ऑफिसमध्ये पंचवीस वर्षे काम केलेली एक व्यक्ती होती. त्यांच्याकडून ताईंनी सगळे काम हळूहळू समजून घेतले. ऑफिसमध्ये त्यांच्या मिस्टरांची अनेक पुस्तके होती. ती त्यांनी अभ्यासपूर्वक वाचून काढली. यूट्यूबवर कामासंबंधीचे व्हिडिओ पाहिले आणि या क्षेत्रातील त्यांचे ज्ञान हळूहळू वाढत गेले. त्या ते ज्ञान आत्मसात करू लागल्या.

सुरुवातीला पतीच्या फोनवर कामाच्या चौकशीसाठी फोन यायचे. त्यावेळी ताई मुलांना साइटवर पाठवायच्या. मुले मोजमाप करून त्याचे ड्रॉइंग तयार करायची. ते ग्राहकांना देऊन त्या पेमेंट घ्यायच्या. त्यातूनच त्यांनी स्टाफचे पगार केले. नाशिकच्या स्वामीनारायण मंदिराचे काम, रेल्वेचे प्रोजेक्ट असे पतीचे अपूर्ण राहिलेले प्रोजेक्ट त्यांनी पूर्ण केले.

हे सर्व तसं खूप अवघड होतं. पहिले वर्ष त्यांचे प्रचंड आर्थिक चणचणीत गेले. त्या काळात स्टाफ सांभाळणे, घरखर्च भागवणे आणि मुलींची फी भरणे यावरच त्यांनी पूर्ण लक्ष केंद्रित केले. कोणी त्यांच्या शिक्षणावर बोट ठेवू नये म्हणून त्यांनी प्रोजेक्ट मॅनेजमेंटमध्ये एम.बी.ए. केले. या परीक्षेत त्या डिस्टिंक्शनमध्ये उत्तीर्ण झाल्या.

त्यानंतर त्यांनी संपूर्ण व्यवसाय बारकाईने शिकून घेतला. टेक्निकल स्टाफ वाढवला आणि घरांच्या, शेतीच्या मोजमापांच्या कामाबरोबरच मोठमोठ्या रस्त्यांचे व खाणींचे प्रोजेक्ट घेण्यासाठी टेंडर भरायला सुरुवात केली.

अनघाताई सांगतात, “मी माझ्या आवाक्याबाहेरचे प्रोजेक्ट घेतले. त्यावेळी लोक म्हणायचे, ‘इतके मोठे प्रोजेक्ट घेऊ नका. तुमची दमछाक होईल. तुम्हाला जमणार नाही.’ पण असे ऐकल्यावर मी अधिक जिद्दीने कामाला लागायचे आणि हाती घेतलेले काम पूर्ण करायचे.”

पतीचा ‘लँड सर्व्हेइंग’सारखा पुरुषांची मक्तेदारी असलेला तांत्रिक व्यवसाय त्यांनी समर्थपणे हाती घेतला. महाराष्ट्रातच नव्हे, तर विविध राज्यांमध्ये शेतजमिनी, मंदिरे, रस्ते आणि खाणी यांच्या मोजणीचे मोठमोठे प्रोजेक्ट त्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले.

नाशिक स्मार्ट सिटी प्रोजेक्ट, गोदा नमामी प्रकल्प, माथेरान घाटाचा ड्रोन सर्व्हे यांसह ठाणे, पुणे, पालघर, जव्हार अशा अनेक ठिकाणचे रोड सर्व्हे त्यांनी केले आहेत. सध्या कर्नाटक रेल्वेचे काम सुरू आहे.

काम करता करता त्या अनेक गोष्टी शिकत गेल्या. नाशिक स्मार्ट सिटी प्रोजेक्टदरम्यान त्यांनी जीआयएस मॅपिंगवर काम केले. तसेच ड्रोनद्वारे मोजमाप घेणे, जमिनीच्या लेव्हलनुसार ड्रॉइंग डिझाइन करणे ही कामेदेखील त्या शिकल्या.

पुरुषांचे वर्चस्व असलेल्या या क्षेत्रात काम करताना त्यांना सतत समस्यांचा सामना करावा लागला. सिव्हिल इंजिनिअरिंगचे लायसन्स नसल्यामुळे शासनाची टेंडर भरताना अनेक अडचणी येत असत. अशावेळी पार्टनरशिप करून त्यांनी कामे केली. काही ठिकाणी स्थानिक सर्व्हेअर्सकडूनही कामे करून घेतली.

कोरोना काळात शासनाची रस्तेमोजणीची कामे करणे सोपे नव्हते. पण अनघाताईंनी या सर्व संकटांना धैर्याने तोंड दिले. बेकायदेशीर काम करण्यास त्यांनी नेहमीच नकार दिला. त्यांच्या कामात इंचाचाही फरक होत नाही, हे पाहून तहसीलदारांनीही त्यांची प्रशंसा केली.

वडिलांकडून मिळालेल्या सत्यनिष्ठेच्या शिकवणीमुळे त्या प्रत्येक संकटावर मात करू शकल्या. असत्याच्या मार्गाने गेल्या असत्या, तर त्या कोट्यवधींच्या घरात पोहोचल्या असत्या; पण तो दलदलीचा मार्ग त्यांना मान्य नव्हता. लोकांनी आपल्यावर बोट उचलू नये, याची खबरदारी त्यांनी कायम घेतली.

मोठे प्रोजेक्ट करताना अनेक आव्हाने पेलत डेडलाइनमध्ये काम करावे लागते. एकीकडे ग्राहकांचे आणि शासनाचे प्रचंड दडपण असते, तर दुसरीकडे मजूर आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांच्याकडून काम करून घेणे हे एका महिलेसाठी सोपे नसते. मात्र, ही सर्व आव्हाने स्वीकारत अनघाताईंनी पन्नास लाखांची गुंतवणूक करून आवश्यक ती महागडी मशिनरी विकत घेतली.

व्यवसाय सुरू केल्यानंतर अवघ्या दोन वर्षांत त्यांनी पतीच्या नावाने 'अतुल कन्स्ट्रक्शन' आणि 'अतुल सिव्हिल लॅब' या दोन कंपन्या सुरू केल्या. यावर्षी त्यांनी 'अतुल ड्रोन सर्व्हे' ही तिसरी कंपनीही सुरू केली. ड्रोनच्या सहाय्याने आता अशा ठिकाणचे सर्व्हे करता येतात, जिथे माणसाला पोहोचणे कठीण असते. त्यांनी स्वतःचे दोन ड्रोनही विकत घेतले आहेत.

स्टाफच्या सर्व अडचणींकडे त्या अत्यंत आपुलकीने लक्ष देतात. त्यांच्या व्यवसायातील ही प्रगती पाहून कोणालाही अचंबित व्हायला होते आणि त्यांच्या या जिद्दीला मनापासून सलाम करावासा वाटतो.

श्रीमती अनघा हिरे

संपर्क - 94222494 75

- नासिक

डॉ. वृषाली जोशी

डॉ. वृषालीताई मुंबईतील दादर येथे लहानाच्या मोठ्या झाल्या. त्यांचे बी.एस्सी.पर्यंतचे शिक्षण मुंबईतच झाले. पुढे त्यांनी बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले. विवाहानंतर त्यांनी एम.ए. (सायकोलॉजी) केले आणि त्यानंतर पीएच.डी. पदवीही संपादन केली.

त्यांच्या शिक्षणामागे त्यांच्या आईचा मोठा पाठिंबा होता. विशेष म्हणजे, त्यांच्या आई विवाहाच्या वेळी फक्त नववी उत्तीर्ण होत्या. मात्र पुढे शिकण्याची तीव्र इच्छा असल्यामुळे त्यांनी विवाहानंतर उर्वरित शिक्षण पूर्ण केले आणि पुढे जाऊन पीएच.डी. पदवीही मिळवली.

डॉ. वृषालीताईंना दोन मुलगे आहेत. दोघांनीही उच्च शिक्षण घेतले असून ते सध्या अमेरिकेत वास्तव्यास आहेत.

मिस्टर जोशी यांची स्वतःची कॉम्प्युटर फर्म होती. त्यांनी आय.आय.एम. अहमदाबादमधून एम.बी.ए. पूर्ण केले. त्यानंतर मॅनेजमेंट विषयात पीएच.डी. करून त्यांनी शिक्षण क्षेत्रात प्रवेश केला. ते पुणे युनिव्हर्सिटीमध्ये एम.बी.ए. विभागाचे एचओडी (विभागप्रमुख) होते.

वृषालीताई सांगतात, “आम्ही वर्षातून एक-दोन वेळा मुलांकडे अमेरिकेला जात असू. नुकतेच जाऊन आलो आणि मुलांना सांगूनही आलो की, आता माझे वय पंच्याहत्तर वर्षे झाले आहे. त्यामुळे यापुढे अमेरिकेला येणे शक्य होणार नाही.”

त्यांच्याशी जितका वेळ फोनवर संवाद झाला, त्यावरून एवढे मात्र जाणवले की, त्या भावनांमध्ये फार गुंतून राहणाऱ्या नाहीत.

वृषालीताईंनी पुण्यात विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शिक्षक म्हणून काम केले. तसेच पुण्यातील एका महाविद्यालयात त्यांनी दोन वर्षे प्राचार्य म्हणूनही जबाबदारी सांभाळली.

वयाच्या पंच्याहत्तराव्या वर्षीदेखील त्या अत्यंत ॲक्टिव्ह आहेत. पुण्यातील सर्व कामांसाठी त्या आजही स्वतः स्कूटर चालवत जातात.

त्यांचे अत्यंत महत्त्वाचे आणि मोठे कार्य म्हणजे त्यांनी तब्बल साठ इंग्रजी पुस्तकांचे मराठीत अनुवाद केले आहेत. हे ऐकून मी अक्षरशः थक्क झाले. विशेष म्हणजे, त्यांना हे अनुवादाचे कार्य शंभर पुस्तकांपर्यंत नेण्याची इच्छा आहे.

मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांवर प्रभुत्व असणारी व्यक्तीच असे दर्जेदार अनुवादकार्य करू शकते.

वृषालीताई या रोटरी क्लबच्या सक्रिय सदस्य आहेत. रोटरी क्लब विविध सामाजिक उपक्रम राबवत असते आणि त्यामध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. पल्स पोलिओ मोहिमेसाठीही त्या रोटरीतर्फे काम करत होत्या.

त्यांना संगीताचीही विशेष आवड आहे. सुगम संगीत स्पर्धांमध्ये त्यांनी पारितोषिके मिळवली आहेत. जुनी हिंदी आणि मराठी गाणी त्यांनी विविध वाद्यांवरही सुंदररीत्या सादर केली आहेत. त्यांनी पाच-सहा गाण्यांच्या ऑडिओ रेकॉर्डिंग्ज मला व्हॉट्सॲपवर पाठवल्या होत्या. ती गाणी त्यांनी अत्यंत सुरेख वाजवली आहेत.

मराठी शब्दकोडी तयार करण्याचा त्यांना छंद आहे. तसेच त्यांनी देश-विदेशात भरपूर प्रवासही केला आहे.

त्यांची सर्व अनुवादित पुस्तके ई-साहित्यवर प्रकाशित झाली आहेत. मी त्यांना म्हटले, "साठ वर्षांवरील व्यक्तींना ऑनलाइन वाचन फारसे आवडत नाही आणि ते त्यांना सोयीचेही वाटत नाही. हातात छापील पुस्तक घेऊन वाचणेच त्यांना अधिक आवडते."

पण वृषालीताई म्हणाल्या, "मला मात्र ऑनलाइन वाचनच अधिक आवडते. तसेच पुस्तक छापल्यानंतर त्याच्या प्रती खपविणे, हा स्वतःमध्ये एक मोठा जॉब असतो. उगाच मित्र-मैत्रिणी किंवा नातेवाईकांना आपले पुस्तक पाठवून त्यांच्यावर वाचनाची सक्ती करणे मला आवडत नाही. ज्यांना उत्सुकता आणि आवड असेल, ते ऑनलाइन वाचतीलच."

ई-साहित्यचे प्रकाशक श्री. सुनील सामंत सर यांच्या माध्यमातून डॉ. वृषालीताईंची ओळख झाली. मात्र त्या अत्यंत व्यस्त असल्यामुळे फोनवर लगेच बोलणे होऊ शकले नाही.

लेख लिहिण्यासाठी मी एक पद्धत ठरवली आहे. ज्यांच्यावर लेख लिहायचा असेल, त्यांच्याशी दोघांच्या सोयीने फोनवर संवाद साधायचा आणि तो व्हॉइस रेकॉर्ड करून ठेवायचा. नंतर सवडीने ते ऐकून लेख लिहायचा. मी आजपर्यंत सात पुस्तके याच पद्धतीने लिहिली आहेत.

वृषालीताईंवर लेख लिहायचे ठरवले आणि त्यांच्याशी फोनवर बोलताना मी व्हॉइस रेकॉर्डर सुरूही केला. सर्व संभाषण संपल्यानंतर रेकॉर्डिंग झाले का ते पाहिले, तर आश्चर्य म्हणजे वृषालीताईंचे बोलणे रेकॉर्ड झालेच नव्हते. हे खरोखरच अनाकलनीय होते!

मग मेंदूमध्ये जे काही रेकॉर्ड झाले होते, ते आठवत मी हा लेख लिहिला. त्यामुळे विज्ञानाने शोधलेल्या यंत्रापेक्षा देवाने निर्माण केलेल्या यंत्रावर अधिक विश्वास बसला.

वृषालीताईंना त्यांच्या पुढील अनुवाद कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा! अशा एका ग्रेट व्यक्तीची ओळख झाली, याचा खूप आनंद वाटला.

वृषाली जोशी - पुणे

संपर्क - 9921746245

वैद्य सुविनय दामले

श्री. सुविनय दामले हे एक उत्तम वैद्य आहेत, असे मी ऐकून होते. त्यांच्याविषयीची काही माहिती मी व्हॉट्सऍपवरही वाचली होती. त्यांचा फोन नंबर मिळाल्यानंतर मी त्यांच्याशी संपर्क साधला. मी जशी कल्पना केली होती, त्यापेक्षाही वैद्य दामले साहेब अतिशय निगर्वी, शांत आणि साध्या स्वभावाचे असल्याचे जाणवले.

हे दामले कुटुंबीय मूळचे वेंगुर्ल्याचे. त्यांच्या कुटुंबातील तब्बल नऊ पिढ्या वेंगुर्ल्यात वास्तव्यास होत्या. त्यांच्या घराण्यात पूर्वी कोणीही वैद्य नव्हते. श्री. सुविनय दामले हे त्यांच्या कुटुंबातील पहिले वैद्य ठरले.

लहानपणापासूनच त्यांना वनस्पतींबद्दल कुतूहल आणि विशेष आकर्षण होते. प्राथमिक शाळेत शिकत असतानाच त्यांची ही आवड दिसून येत होती. त्यांच्या आईचे मामा नेहमी त्यांच्या घरी येत असत. त्यांना विविध वनस्पतींचे उत्तम ज्ञान होते. येता-जाता ते घरासमोर असलेल्या तुळशीची पाने तोडून खात असत. साहजिकच, कुतूहलापोटी लहान सुविनय त्यांना विचारायचे, “तुम्ही अशी पाने खात-खात का येता?”

त्यावर ते म्हणायचे, “तुळशीची पाने अत्यंत औषधी असतात. तुला जर वनस्पतींबद्दल जाणून घ्यायचे असेल, तर मी तुला विविध वनस्पतींची माहिती सांगीन.”

त्या वेळी दामले सर सातवीत शिकत होते. त्यानंतर सुट्टीच्या दिवशी ते मामांसोबत जंगलात जाऊ लागले. तेथे त्यांच्या मामांकडून त्यांना विविध वनस्पतींची माहिती आणि त्यांचे औषधी गुण समजत गेले.

खरंतर सरांना केटरिंगमध्ये पदवी घेऊन शेफ व्हायचे होते. हॉटेल मॅनेजमेंटचे शिक्षण घेण्याची त्यांची इच्छा होती. त्या काळात ते अकरावी-बारावीसाठी रत्नागिरी येथे शिक्षण घेत होते. मात्र त्याचवेळी कुडाळ येथे आयुर्वेदिक कॉलेज सुरू झाले. त्यांचे वडील कुडाळ येथे राहत असल्यामुळे त्यांनी मुलाने याच कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा, असे ठरवले. त्या काळी दहावीनंतर या कॉलेजमध्ये प्रवेश मिळत असे.

दहावीचे प्रमाणपत्र घरी असल्यामुळे वडिलांनी स्वतःच प्रवेश अर्ज भरला आणि मुलाला सांगितले, "तू आता रत्नागिरीहून परत ये. तुला कुडाळच्या आयुर्वेदिक कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला आहे."

त्यावर सर म्हणाले, "बाबा, मला स्वयंपाकशास्त्र शिकायचे आहे. आयुर्वेदिक कॉलेजमध्ये जाऊन मी काय करणार?"

त्यावर वडील शांतपणे म्हणाले, "आयुर्वेदाच्या अभ्यासात आहारशास्त्रही आहे. तेही तुला शिकायला मिळेल."

वडिलांचे म्हणणे त्यांना मान्य करावे लागले आणि त्यांनी रत्नागिरीचे शिक्षण सोडून कुडाळ येथील आयुर्वेदिक कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. वडिलांच्या मते, आयुर्वेद शिक्षणामध्ये वनस्पतिशास्त्र, शरीरशास्त्र आणि आहारशास्त्र यांचा अभ्यास करता येणार होता. हे ऐकल्यावर सुविनय सर

आनंदाने कॉलेजमध्ये दाखल झाले. ते स्वतः सांगतात की, त्या वेळी "वैद्य" आणि "डॉक्टर" यांतील फरकसुद्धा मला माहीत नव्हता.

दरम्यान, श्री. राजीव दीक्षित यांच्याशी दामले सरांची ओळख झाली. तब्बल सहा वर्षे त्यांनी दीक्षित सरांसोबत काम केले. राजस्थान, गुजरात अशा अनेक राज्यांच्या दौऱ्यांमध्ये ते त्यांच्यासोबत गेले. भारतीयत्व म्हणजे काय, याबाबत समाजात जागृती निर्माण करणे हा त्यामागील उद्देश होता.

दामले सर म्हणतात की, आयुर्वेद कॉलेजमध्ये शिकवला जाणारा अभ्यास पाश्चात्त्य विचारसरणीच्या प्रभावाखाली शिकवला जातो. पुढे ते असेही म्हणतात की, "संपूर्ण भारतात कदाचित मी एकटाच असा असेन, जो आयुर्वेदाचा विचार पूर्णपणे भारतीय दृष्टिकोनातून करतो."

त्यांच्या मते, "रक्तदाब" हा शब्द सुश्रुतकालीन आयुर्वेदात नाही. आज 'डायबिटीज'सारख्या आजारांचे निदान केवळ रक्त तपासणीच्या अहवालावर केले जाते आणि त्यावर आयुर्वेदिक औषधे दिली जातात. पण ही पद्धत योग्य नाही. रिपोर्ट नॉर्मल येण्यापेक्षा रुग्ण शारीरिकदृष्ट्या नॉर्मल होणे अधिक महत्त्वाचे आहे.

या विचारातून दामले सरांनी वेगळ्या दृष्टिकोनातून विचार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या मते, भारतीयत्व विसरल्यामुळेच आज अनेक रोग आणि विकार वाढले आहेत. ते म्हणतात, "आम्ही जे शिकलो, तेच मुळात चुकीच्या पद्धतीवर आधारित होते. सर्व काही पुस्तकी ज्ञानावर आधारित शिकवले गेले. रुग्णाला नेमके काय त्रास होतात, हे समजून घेण्यापेक्षा यंत्र काय सांगते, यावरच भर दिला जातो."

त्यांच्या मते, रुग्णाचे निरीक्षण करणे आणि त्याचे म्हणणे लक्षपूर्वक ऐकणे हे अधिक महत्त्वाचे आहे. पण तसे न होता यंत्रांच्या निष्कर्षांवर आधारित औषधोपचार केले जातात. परिणामी, अनेकांना आयुष्यभर औषधे घ्यावी लागतात आणि त्यांचे दुष्परिणामही भोगावे लागतात. डायलिसिस, गुडघे बदलणे अशा अवस्थांपर्यंत परिस्थिती पोहोचते.

दामले सरांच्या मते, भारतीय परंपरा, रूढी, उपवास आणि पिढीजात संस्कार यांमध्ये आरोग्यदायी जीवनपद्धती दडलेली आहे. त्यांनी या दृष्टीने संशोधन सुरू केले. देवपूजेमधील षोडशोपचार पद्धतीमागेही आरोग्यशास्त्र दडलेले आहे, हे त्यांनी अभ्यासातून शोधले. साध्या आचमनातही आरोग्यदायी विचार आहे, तसेच नमस्कार आणि स्वतःभोवती प्रदक्षिणा घालण्यातही शरीरासाठी फायदे आहेत, असे त्यांना जाणवले.

या सर्व पद्धती त्यांनी आपल्या रुग्णांवर वापरायला सुरुवात केली आणि त्यातून चांगले परिणाम मिळू लागले. त्यामुळे आयुर्वेदाचा विचार भारतीय दृष्टिकोनातूनच व्हायला हवा, असे त्यांचे ठाम मत बनले.

सरांनी बी.ए.एम.एस. ही पदवी प्राप्त केली आहे.

वैदू आणि वैद्य यांतील फरकही त्यांनी स्पष्ट केला. त्यांच्या मते, वैदू हे पारंपरिक, पिढीजात अनुभवावर आधारित उपचार करतात. त्यांना वनस्पतींचे ज्ञान असते आणि त्या अनुभवाच्या आधारे ते विविध आजारांवर उपचार करतात. शासनानेही त्यांना मान्यता दिलेली आहे. मात्र वैद्य हे शास्त्र आणि अनुभव या दोन्हींचा आधार घेऊन उपचार करतात.

दामले सरांनी सुरू केलेल्या गुरुकुल पद्धतीबद्दल विचारले असता त्यांनी सांगितले की, भारत सरकारच्या ‘आयुष’ विभागांतर्गत कार्यरत

विद्यापीठामार्फत संपूर्ण भारतातून बहात्तर राष्ट्रीय गुरु निवडले गेले आहेत. त्यामध्ये दामले सरांचाही समावेश आहे. गेली चार वर्षे दरवर्षी दोन आयुर्वेदिक डॉक्टरांना त्यांच्या मार्गदर्शनासाठी पाठवले जाते.

हे विद्यार्थी बी.ए.एम.एस. पदवीधर असतात. सर ज्या प्रकारे आयुर्वेदाचा वापर करतात, त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी त्यांना एक वर्ष प्रशिक्षण दिले जाते. सरकारकडून या विद्यार्थ्यांना मानधनही दिले जाते. सध्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली जम्मू-काश्मीर आणि हरियाणा येथील दोन विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर हे विद्यार्थी स्वतःची प्रॅक्टिस सुरू करतात.

सरांनी शालेय विद्यार्थ्यांसाठीही एक उपक्रम सुरू केला आहे. आठ ते अठरा वयोगटातील मुलांना लहानपणापासून आयुर्वेद समजावून सांगण्याचा त्यामागील हेतू आहे. पुढे ते कोणत्याही शाखेत शिक्षण घेत असले, तरी भारतीयत्व आणि आयुर्वेद विसरू नयेत, हा त्यामागील उद्देश आहे. हा उपक्रम ऑनलाइन पद्धतीने राबवला जातो.

आजपर्यंत विद्यार्थी आणि पालक मिळून सुमारे तीन हजार लोक या उपक्रमाशी जोडले गेले आहेत. त्यांना आयुर्वेदाचे मूलभूत ज्ञान दिले जाते. मुलेही अतिशय उत्सुकतेने प्रश्न विचारतात. त्यातून त्यांचे चिंतन आणि मनन सुरू होते.

दामले सरांच्या मते, भारतातील शिक्षणपद्धती खूप ठोकळेबाज झाली आहे. ती बदलण्याची गरज आहे. म्हणूनच त्यांनी घेतलेले बी.ए.एम.एस. शिक्षण अधिक व्यावहारिक व्हावे, यासाठी ते विविध उपक्रमांद्वारे प्रयत्न करत आहेत.

शिवाय, डॉक्टर म्हणून ते कुडाळ आणि पुणे येथे प्रॅक्टिसही करतात.

आजच्या यंत्राधारित वैद्यकीय व्यवस्थेमध्ये केवळ तपासणी अहवालांवर अवलंबून न राहता रुग्णाच्या प्रत्यक्ष त्रासाचा विचार करून उपचारपद्धती ठरवणे, हे त्यांचे मोठे वैशिष्ट्य आहे. लोकांना सुरुवातीला हे विचार पटत नसले, तरी दामले सर आपल्या अनुभवातून ते पटवून देतात. कमी औषधांमध्ये आणि कमी वेळात रुग्णांना आराम मिळवून देणे, हे त्यांच्या कार्याचे विशेष महत्त्व आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्यास मनःपूर्वक शुभेच्छा!

सुविनय दामले

संपर्क - 9673938021

माधवी कुंटे

माधवीताई कुंटे या बी.ए. पदवीधर असून त्यांना ललित लेखन आणि काव्याची विशेष आवड आहे. विविध कलांमध्येही त्यांना प्राविण्य आहे. समाजकार्याची त्यांना केवळ आवडच नाही, तर त्याबद्दल मनापासून तळमळही आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल अनेक नामांकित वृत्तपत्रांनी घेतलेली आहे.

त्यांचा मुलगा अजित हा सातव्या महिन्यातच जन्माला आला. त्याच्या जन्मावेळी थोडी हेळसांड झाली; मात्र अजितच्या आयुष्याची दोरी आणि माधवीताईंच्या मातृत्वाची ताकद खंबीर होती. जणू देवानेच त्यांच्या आयुष्याची कठीण परीक्षा पाहण्याचे ठरवले होते.

मातृत्वाची अनेक सुंदर स्वप्ने त्यांनी रंगवली होती; पण अजितच्या जन्मानंतर ती स्वप्ने क्षणात विरून गेली. माधवीताईंनी एका विशेष मुलाला जन्म दिला होता. अजित जन्मतःच 'सेरेब्रल पाल्सी' हा आजार घेऊन आला होता. अवघ्या एकविसाव्या वर्षी आपल्या मुलाला अशा अवस्थेत पाहून माधवीताई एका क्षणात प्रौढ झाल्या. अशा मुलाला वाढविण्याचे मोठे आव्हान त्यांच्या समोर उभे ठाकले होते.

या प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी देवानेच आपल्याला बळ दिले, अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. अजितचा जन्म झाला तेव्हा त्याचे वजन केवळ ११०० ग्रॅम होते. सहा महिन्यांपर्यंत त्याच्यात कोणतीही हालचाल दिसून येत नव्हती. जन्मल्यानंतर लगेच ऑक्सिजन कमी पडल्यामुळे शरीराचा तोल सांभाळणाऱ्या पेशींवर परिणाम झाला होता.

डॉक्टरांनी त्याला बहुविकलांग असल्याचे सांगितले. एवढेच नव्हे, तर त्याच्या बुद्धीवर आणि दृष्टीवरही परिणाम झाल्याचे निदान करण्यात आले.

याच क्षणापासून माधवीताई आणि त्यांचे पती श्री. मोरेश्वर यांच्या आयुष्यातील खरी कसोटी सुरू झाली.

प्रत्येक दिवस ही त्यांची परीक्षा पाहणारा होता आणि माधवीताई म्हणतात की, "आजही आणि पुढेही प्रत्येक दिवस आमची परीक्षा पाहणाराच आहे."

पती-पत्नी दोघे मिळून अजितची सेवा, स्वच्छता आणि त्याला काही ना काही शिकवण्याचे काम करू लागले. कुंटे दांपत्यांच्या आयुष्यातील हौस-मौज हा शब्दच जणू पुसला गेला. त्यांच्या मनात सतत मुलाचाच विचार आणि त्याचीच काळजी असायची.

अजितचे पाय जन्मतःच एकमेकांत गुंतलेले होते. हातही वेडेवाकडे होते. दृष्टी अधू असल्यामुळे तो घरभर फिरूही शकत नव्हता. उलट या लहान वयातच त्याला सलाईन, इंजेक्शन आणि शस्त्रक्रियांना सामोरे जावे लागले. दुसरा कोणताही पर्याय नव्हता. शस्त्रक्रिया करून त्याचे पाय एकमेकांतून सोडवण्यात आले. तसेच उजव्या हातावर 'मसल ट्रान्सफर'ची शस्त्रक्रिया करून तो सरळ करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या सर्व शस्त्रक्रिया अत्यंत कठीण होत्या. कधी कधी माधवीताईंना निराश आणि हताश वाटत असे. "हे आपल्या वाट्यालाच का आले?" असा प्रश्न त्यांच्या मनात येई. कधी रागही येत असे. टोकाचे वाईट विचारही मनात यायचे. पण अजितचा सांभाळ करणे थोडे सोपे व्हावे यासाठी नातेवाईक आणि मित्रपरिवाराची त्यांना मोठी मदत झाली.

अजित अपंग आहे, याची त्यांना कधीच लाज वाटली नाही. वयाच्या पाचव्या वर्षापर्यंत तो स्वतःहून उठू-बसू शकत नव्हता. सतत गळणारी लाळ पुसावी लागत असे. मग माधवीताईंनी स्वतःच फिजिओथेरपी शिकून घेतली. फिजिओथेरपी हाच एकमेव आधार आणि उपाय होता. या सर्व प्रयत्नांमुळे अजितमध्ये हळूहळू बदल होऊ लागला.

तो अतिशय शांत आणि सहनशील होता, ही त्याची मोठी जमेची बाजू होती. सरपटत पुढे कसे जायचे, हेही माधवीताईंनी स्वतः प्रात्यक्षिक करून त्याला शिकवले. मात्र बाहेर जाताना त्याला कडेवर घेऊनच न्यावे लागायचे. त्याचे बाबा कामावर गेल्यानंतर सर्व जबाबदारी माधवीताईंच्याच खांद्यावर येत असे.

कडेवर बसलेल्या मुलाकडे रस्त्यावरील लोक अनेकदा विचित्र नजरेने पाहत असत. तरीही त्यांनी त्याला सोळाव्या वर्षापर्यंत खांद्यावर किंवा कडेवर घेऊन उत्सवात गणपती दाखवले, समुद्रकिनाऱ्यावर नेले आणि त्याचे बालपण आनंदी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले.

हे सर्व करत असतानाच त्यांनी त्याला अपंगांच्या विशेष शाळेत घातले. मात्र शाळेत नेताना त्याला कडेवर घेऊन बसमध्ये चढणे-उतरणे खूप कठीण जायचे. पण माधवीताईंची जिद्द मोठी होती. हळूहळू अजितला शाळा आवडू लागली. शाळेत शिकवलेली गाणी आणि घरात शिकवलेले श्लोक तो उत्तमरीत्या पाठ करायचा. दृष्टी अधू असली तरी त्याची स्मरणशक्ती विलक्षण चांगली होती.

काही दिवस तर तो आडवा असतानाही त्याला अक्षरओळख करून देण्यात आली. हळूहळू तो वाचू लागला. जसजसा तो मोठा होत गेला, तसतशी त्याची स्मरणशक्ती अधिक विकसित होत गेली. शिकवलेल्या

गोष्टी तो पटकन पाठ करायचा. त्यामुळे वक्तृत्व स्पर्धा, नाट्यछटा आणि कथा कथन स्पर्धांमध्ये माधवीताई त्याला घेऊन जात असत.

असे करताना कधी कधी त्यांना दडपण यायचे. स्टेजवर अजित सरपटत पुढे यायचा. मात्र हळूहळू तो स्पर्धांमध्ये भाग घेऊन बक्षिसे मिळवू लागला. त्यामुळे माधवीताईंचाही उत्साह वाढला. त्या परिश्रमपूर्वक त्याची तयारी करून घ्यायच्या.

सोळाव्या वर्षापासून अजित 'एल्बो क्रचेस'च्या सहाय्याने दैनंदिन व्यवहार करू लागला. विशेष शाळांच्या नियमानुसार अठराव्या वर्षी त्याची शाळा बंद झाली; पण माधवीताईंनी घरी त्याचा अभ्यास घेणे सुरूच ठेवले. त्यांनी त्याला संगणक चालवायलाही शिकवले. बाहेर फिरता यावे म्हणून चारचाकी गाडी घेतली.

अजित आता स्मार्टफोनही उत्तम प्रकारे वापरतो. मात्र हे सर्व तो डाव्या हाताने करतो, कारण त्याचा उजवा हात कार्यरत नाही. व्हॉट्सॲपवर त्याने मित्रांचा एक गटही तयार केला आहे. दैनंदिन व्यवहारांमध्ये त्याला अडचणी येऊ नयेत म्हणून माधवीताईंनी घरात अनेक सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत.

अजितने कथाकथनाच्या क्षेत्रात स्वतःचा वेगळा ठसा उमटवला आहे. अनेक दिग्गज लेखकांच्या कथा तो अत्यंत प्रभावीपणे सादर करतो. राज्यशास्त्र विषय घेऊन त्याने बी.ए.ची पदवी संपादन केली आहे. त्याच्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात माधवीताईही त्याच्यासोबत कॉलेजला जात असत. सर्व लेक्चर्सना बसत आणि घरी आल्यावर त्याचा अभ्यास घेत असत.

अजितची जिद्द आणि चिकाटी महत्त्वाची होतीच; पण त्याचबरोबर माधवीताईंची जिद्द, परिश्रम आणि चिकाटीदेखील तितकीच वाखाणण्याजोगी आहे. अजितच्या आतापर्यंतच्या प्रगतीची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने २०१४-१५ या वर्षी त्याला 'अपंग कल्याण राज्य पुरस्कार' देऊन सन्मानित केले.

एकंदरीत, अजितची ही लढाई आयुष्यभर चालणारी आहे. मात्र त्याला आई-वडिलांची खंबीर साथ लाभली आहे.

सौ. माधवीताईंनाही 'आदर्श माता'सह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. स्वतःची हौस-मौज बाजूला ठेवून, अथक परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी अजितला उत्तम घडवले. त्या म्हणतात, "आपले मूल दिव्यांग आहे, हे स्वीकारणे सोपे नसते. पण त्याच्यातील एखादा गुण ओळखून त्याला घडवले पाहिजे."

समाजकल्याण खात्याकडून अजितला स्वयंरोजगार पुरस्कारही मिळाला आहे. डॉ. दिलीप देशपांडे यांनी दिव्यांग मुलांसाठी सुरू केलेल्या एका वर्कशॉपमध्ये अजितला नोकरी मिळाली आणि त्याच कामासाठी त्याला वरील पुरस्कारही प्राप्त झाला.

स्वतः माधवीताई या हरहुन्नरी कलाकार आहेत. ज्यांना आवड आहे अशा महिलांनाही त्या विविध कला शिकवतात. तसेच दिव्यांग मुलांच्या पालकांचे समुपदेशनही करतात.

खरंच, या संपूर्ण कुटुंबाचे कितीही कौतुक केले तरी ते कमीच आहे. आलेल्या परिस्थितीसमोर रडत न बसता तिचा धैर्याने सामना कसा करावा

आणि कठीण प्रसंगात गोंधळून किंवा हतबल न होता शांतपणे, समाधानाने प्रश्न कसे सोडवावेत, हे कुंटे दांपत्यांकडून शिकण्यासारखे आहे.

अजितच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

माधवी कुंटे
संपर्क - 9423013137

संकल्प फाऊंडेशन, सामनेर - 'संवाद-सारथी'

संकल्प फाऊंडेशनचे उपाध्यक्ष श्री. विशाल अशोक सोनकुळ, सामनेर यांच्याशी माझा परिचय कु. अंजना लगस हिच्यामुळे झाला. ती अपंग असून हेल्पर्स ऑफ द हॅण्डिकॅप्ड, कोल्हापूर या संस्थेत ग्रंथपाल म्हणून काम करते. तिची मुलाखत संकल्प फाऊंडेशनने घेतली होती व ती मुलाखत संकल्प फाऊंडेशनच्या YouTube Channel (https://www.youtube.com/channel/UCLreGHt8N9Kxv3fabJQ3lXQ/) व Facebook Page (https://www.facebook.com/SankalpFoundationorg/) वर ऑनलाईन प्रसिद्धही झाली होती. अंजना ही वयाने लहान असली तरी माझी मैत्रीण असल्यामुळे या मुलाखतीचा आधार घेऊन जिद्दीच्या पायावर ही तिची जीवन कहाणी मी लिहली व प्रसिद्ध केली. संकल्प फाऊंडेशनच्या कामाबद्दल मला उत्सुकता होती. मी श्री.विशाल सरांशी बोलले, त्यांनी आपण संकल्प फाऊंडेशनच्या वतीने जे कार्य करतो ते लिखित स्वरुपात पाठवून दिले. त्यांच्याच शब्दात ते येथे मी पुस्तकात घेतले आहे.

संकल्प फाऊंडेशन, सामनेर -

संकल्प फाऊंडेशन, सामनेर हे गेल्या १२ वर्षापासून महाराष्ट्रातल्या विविध भागात ऑफलाइन तसेच ऑनलाइन मोड मध्ये काम करत आहे. संकल्प फाऊंडेशन, सामनेर महात्मा गांधींच्या “खेड्याकड़े चला” तसेच रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांच्या “शिव भावे जीव सेवा” या तत्वानुसार आमच्या NGO चे कार्य चालते.

मागील १२ वर्षात ग्रामीण विकास, पर्यावरण, शिक्षण, जल संधारण, आरोग्य, महिला सक्षमीकरण इत्यादि विविध क्षेत्रात कार्य करते आहे.

स्वतःबद्दल काही माहिती: युवक असताना एका अपघातामध्ये माझा एक हात दण्डापासून गमवावा लागला व एका पायात ७० टक्के क्षमता गमवावी लागली. तरी रामकृष्ण मिशन व स्वामी विवेकनंदांचे संस्कार यांमुळे माझ्या जीवनात मी व्यवसाय आणि समाज कार्य दोन्हीही सांभाळत आहे.

सागरमित्र अभियान उपक्रम:

एका अपंग व्यक्तीच्या दृष्टिकोनातून मी विश्वातील व्यक्तींकडे बघत असतो, तेव्हा मला जाणवते की, जगातील लोकांचा पर्यावरणाकडे बघण्याचा दृष्टिकोन यात मानसिक अपंगत्व आहे. जगातील लोक आपल्या पृथ्वीवरील अस्तित्वात असलेल्या ७१ टक्के समुद्राकडे दुर्लक्ष करतात. निसर्ग पाहण्याच्या दृष्टिकोनातील मानसिक अपंगत्व जगातील लोकांच्या मनातून काढण्यासाठीच्या मिशन वर मी आहे.

माझे गुरु मा.विनोद बोधनकर, सह-संस्थापक व सह-संचालक TAA-सागरमित्र अभियान यांची व माझी पहिली भेट पुणे येथे जुलै २०१४ मध्ये झाली. या भेटी दरम्यान विनोद सरानी मला सागरमित्र अभियान काय आहे व ते कसे कार्य करते याबद्दल सविस्तरपणे सांगितले. जळगाव येथे TAA-सागरमित्र अभियान सुरु करण्यासाठी काय केले पाहिजे याचे मार्गदर्शन केले आणि म्हणूनच मी TAA-सागरमित्र अभियान, पुणे, यांचे सोबत जोड़लो गेलो. सागरमित्र अभियानात आम्ही ५ वी ते १२ वी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सागराबद्दल ज्ञान, सागराबद्दल करुणा व अहिंसा

तसेच “वैश्विक विचार व वैयक्तीक कृती” (Think Universally Act Personally) या तत्वानुसार श्रम जागृती संस्कार रुजवित असतो.

संकल्प फाऊंडेशनच्या माध्यमातून TAA सागरमित्र अभियान, पुणे, यांच्या सोबत ३० सप्टेंबर २०१४ पासून जळगाव जिल्ह्यातील ०३ शाळांनी सुरु केलेल्या या प्रवासात, आज ८० शाळेतील ६४००० विद्यार्थ्यांसोबत पर्यावरण शिक्षण व चरित्र निर्माणाचे कार्य, आम्ही करत आहोत. या ६४००० सागरमित्रांनी मागील ११ वर्षात १० टन (१०००० किलो) स्वच्छ, कोरडे व रिकामे टाकाऊ प्लास्टिक आपल्या घरात जमा करून ते शाळेत आणून दिले, यामुळे १००० sq km इतके नदी, समुद्र व शेतीची जमीन हे सर्व निसर्गाचे घटक प्लास्टिक प्रदुषण होण्यापासून वाचले. सागरमित्र उपक्रमामुळे शाळेतील इयत्ता ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व अहिंसेचा संस्कार होण्यास मदत होते.

नावीण्यपूर्वक सामाजिक उपक्रम: ग्रामीण तसेच शहरी भागात शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मेमरी टेकनिक वर्कशॉप, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन इ.चे आयोजन केले. ग्रामीण भागातील बांधकाम कामगार यांचेसाठी नोंदणी व साहित्य वाटप कार्यशाळेचे आयोजन केले. सुरक्षित रस्ता वाहतूक सप्ताह अंतर्गत शेतकऱ्यांच्या बैल गाडीला रिफ्लेक्टर्स लावण्याचे कार्य केले.

ऑनलाइन वेबिनार सीरीज उपक्रम: कोरोना काळात जेव्हा सर्व फिजिकल ऍक्टिव्हिटीज बंद होत्या, तेव्हा आम्ही ऑगस्ट २०२० मध्ये ऑनलाइन वेबिनार सीरीज सुरु केली. संकल्प फाऊंडेशनच्या ऑनलाईन वेबिनार सिरीज सुरु करण्याची प्रेरणा मला माझे गुरु श्री.विनोद बोधनकर,

सह-संस्थापक TAA-सागरमित्र अभियान व श्री.नरेंद्र चुघ, अध्यक्ष - जलबिरादरी महाराष्ट्र यांच्याकडून मिळाली. विनोद बोधनकर सर व नरेंद्र चुघ सर यांनी कोरोना काळात 'आओ नदी को जाने' या ऑनलाईन वेबिनार सिरीजची सुरवात केली. एकूण ४४ वेबिनार्स मध्ये प्रत्येक रविवारी जल, जंगल, जमीन, जानवर या विषयात काम करणाऱ्या संपूर्ण भारतातील महानुभवांना आमंत्रित केले. या वेबिनार सिरीज ऑनलाईन वेबिनार मुळे मला सातत्य व संवाद याचे महत्व समजले. यातूनच मला 'आओ तापी नदी को जाने', संकल्प फाऊंडेशनचे ऑनलाईन वेबिनार सिरीज तसेच 'संवाद-सारथी' वेब संवाद सत्र उपक्रम सुरु करण्याची प्रेरणा मिळाली.

या ऑनलाइन संवाद सत्रात ग्रामीण विकास, रोजगार, स्पर्धा परीक्षा, या टीव्ही व मोबाईलचे काय करायचे या विषयावर पालक व विद्यार्थीं यांचेसाठी ऑनलाइन कार्यशाळा, आपले दैवत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवन चरित्रावर ऑनलाइन माध्यमातून व्याख्यानाचे आयोजन तसेच जल साक्षरता, विश्व शान्ति, आरोग्य इ. विषयावर वेबिनारचे आयोजन केले.

'संवाद-सारथी' उपक्रम: 'संवाद-सारथी' उपक्रम सुरु करण्यापूर्वी सतत काही गोष्टी मनात येत होत्या. एक अपंग व्यक्ती स्वतःकडे कुठल्या दृष्टिकोनातून बघत असतो. कुटुंब, समाज व विश्व एका अपंग व्यक्तीकडे कुठल्या दृष्टीने बघत असते. एक अपंग व्यक्ती स्वतःकडे, त्याच्या कुटुंबाकडे, त्याच्या शिक्षण किंवा रोजगाराकडे कुठल्या दृष्टिकोनातून बघतो. एक अपंग व्यक्ती समाजाकडे, समाजात, समाजासाठी स्वतःला व समाजाला कसा बघतो. या सर्वांचा ध्यास व शोध घेत असताना 'संवाद-सारथी' या वेब संवाद सत्राचा जन्म झाला.

कोरोना काळातच आमच्या NGO च्या प्रतिनिधी यांनी समाजातल्या खुप लोकांशी, तज्ञ यांचेशी चर्चा केल्यानंतर, आमचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.ए.पी.वाणी, डॉ.पराग जहागिरदार, महेश गोरडे, भावनाताई विसपुते तसेच संस्थेचे पदाधिकारी यांच्या सल्ल्याने दि.१५.०८.२०२२ रोजी भारताच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त 'संवाद-सारथी' एक नविन संवादात्मक उपक्रम सुरु करायचे ठरविले.

‘संवाद-सारथी’ या उपक्रमात आम्ही विशेष व्यक्तींना (अपंग व्यक्तींना) त्यांच्या जीवनातील संघर्ष कहाणी मांडण्यासाठी ऑनलाईन सत्रात संवाद साधण्यासाठी आमंत्रित करणार आहोत.

एक विशेष व्यक्ती (अपंग व्यक्ती) (Specially Challenged/Divyang) जीवनात आलेल्या आव्हानांना स्वीकारून स्वत:च स्वतःची सारथी बनून संघर्षात्मक जीवन जगत असते.

अपंग व्यक्ती आपल्या जीवनातील संघर्ष करीत असताना - त्यांच्यातील सारथी शक्ती किंवा ऊर्जा कुठून मिळवितो, जीवनातील समतोल कसा राखतो, आपल्यातील उणिवा शोधून दूरदृष्टीतून विश्वाशी कसे जुळवून घेतो हे जाणून घेणार आहोत. आपल्या जीवनातील स्व-अनुभव मांडण्यासाठी आम्ही विशेष व्यक्तींना (अपंग व्यक्तींना) ऑनलाईन संवादासाठी आमंत्रित करून त्यांच्या कडून शिकण्यासाठी ‘संवाद-सारथी’ या उपक्रमाचा शुभारंभ केला आहे.

'संवाद-सारथी' वेब संवाद सत्र गोषवारा'

'संवाद-सारथी' वेब संवाद सत्र संख्या	181	भारत व नेपाल देशातील
'संवाद-सारथी' वेब संवाद सत्र संख्या	166	महाराष्ट्र राज्यातील
'संवाद-सारथी' वेब संवाद सत्र संख्या	015	महाराष्ट्र राज्या बाहेरील
'संवाद-सारथी' वेब संवाद सत्रात समाविष्ट राज्ये	010	महाराष्ट्र, कर्नाटक, पंजाब, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, जम्मू आणि कश्मीर, गोवा, नवी दिल्ली, राजस्थान, गुजरात
'संवाद-सारथी' वेब संवाद सत्रात समाविष्ट महाराष्ट्र राज्यातील जिल्हे	030	नाशिक विभाग (५ जिल्हे): नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर पुणे विभाग (५ जिल्हे): पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा मुंबई विभाग (७ जिल्हे): मुंबई शहर, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग मराठवाडा विभाग (८ जिल्हे):संभाजी नगर, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड़, लातूर, धाराशीव अमरावती विभाग (५ जिल्हे): अकोला, अमरावती, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ नागपूर विभाग (६ जिल्हे): नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली

'संवाद-सारथी' वेब संवाद सत्रात समाविष्ट महानुभवांचे (वक्त्यांचे) कार्यक्षेत्र (Working Sectors)		Sports: Swimming, Cycling, Fencing, Wrestling, Marathon, Triathlon Social Service: NGO, Shelter, Skill Development Government: Tehsildar, STI, Sports Officer Sahitya: Lawyers Education & Research: Medical Wing: Businessman: Self Employed, Industrialist
'संवाद-सारथी' वेब संवाद सत्रात समाविष्ट अपंगत्वाचा प्रकार		Locomotor, Paraplegic, Visually Impaired, Polio, Amputee, Muscular Dystrophy, Dwarfism, Sickle Cell

संवेदना केंद्र

संवेदना केंद्र, हरंगुळ जिल्हा लातूर याविषयीची थोडी माहिती मला व्हॉट्सऍपवर मिळाली होती. त्या माहितीखाली केंद्रप्रमुख श्री. सुरेशदादा पाटील यांचा फोन नंबर दिलेला होता. मी त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी मला केंद्राविषयी सविस्तर माहिती सांगितली.

श्री. पाटील सरांचा मुलगा मिथिलेश हा बहुविकलांग असून मतिमंद आहे. तो अगदी लहान असतानाच त्यांच्या लक्षात आले की आपला मुलगा सर्वसामान्य मुलांसारखा नाही. त्याला फिजिओथेरपीची गरज आहे; मात्र त्या काळात लातूर येथे तशी व्यवस्था उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्यांनी मुलासाठी प्रयत्न सुरू केले.

जनकल्याण संस्था ही मूळची पुण्यात स्थापन झालेली संस्था आहे. महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता, त्या काळात दुष्काळ निवारणासाठी ही संस्था कार्यरत होती. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी तसेच नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्ती निवारणासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली होती.

श्री. पाटील सरांनी या संस्थेच्या संचालकांशी चर्चा केली. मतिमंद मुलांच्या विकासासाठी स्वतंत्र संस्था स्थापन होणे आवश्यक आहे, तसेच ही मुले समाजापासून वंचित राहू नयेत यासाठी त्यांच्यासाठी कायमस्वरूपी कार्य होणे गरजेचे आहे, हे त्यांनी संस्थेच्या संचालकांना पटवून दिले.

त्यांनाही हा विचार योग्य वाटला आणि 2006 साली हरंगुळ, तालुका लातूर येथे 'संवेदना' ही संस्था स्थापन झाली.

मेंदूचा पक्षाघात अर्थात सेरेब्रल पाल्सी आणि मतिमंदत्व असलेल्या मुलांसाठी ही संस्था कार्य करू लागली. येथे फिजिओथेरपी, स्पीच थेरपी, ॲक्युप्रेशर थेरपी, म्युझिक थेरपी, मानसोपचार तज्ज्ञ तसेच विशेष शिक्षकांची नेमणूक करण्यात आली.

सर सांगतात, "ही मुले अतिशय निरागस आणि प्रेमाची भुकेली असतात. अशा मुलांचा सांभाळ करताना पालक अनेकदा हतबल होतात."

दररोज सकाळी दहा वाजता मुले संस्थेत येतात आणि सायंकाळी चार वाजता घरी जातात. संवेदना संस्थेकडे पाच वाहने आहेत. या वाहनांतूनच मुलांची शाळेत ये-जा केली जाते. संस्थेत आल्यानंतर मुलांना संगीतासह इतर अनेक गोष्टी शिकवल्या जातात.

सध्या संस्थेत 80 मुले आहेत. त्यापैकी 20 मुलांसाठी वसतिगृहाची सुविधा उपलब्ध आहे. हे वसतिगृह अठरा वर्षांवरील मुलांसाठी आहे. वसतिगृहात राहणाऱ्या मुलांच्या पालकांकडून दरमहा 8000 रुपये शुल्क घेतले जाते. त्यामध्ये जेवण, नाश्ता तसेच काही मुलांसाठी आवश्यक असणाऱ्या केअरटेकरचा खर्च समाविष्ट असतो. मुलांची सर्वांगीण देखभाल वसतिगृहात केली जाते.

शाळेत येणाऱ्या मुलांकडून कोणतीही फी घेतली जात नाही. संस्थेला समाजाकडून देणग्या मिळतात. शासनाकडून सात कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी अनुदान मिळते; मात्र ते केवळ 25 विद्यार्थ्यांसाठीच पुरेसे असते. उर्वरित विद्यार्थ्यांसाठी लागणारा खर्च समाजाच्या देणगीतून

भागवावा लागतो. एकूण खर्चापैकी 40 टक्के अनुदान शासनाकडून, तर उर्वरित 60 टक्के समाजाकडून मिळते.

कामाचे महत्त्व जाणणारे लोक समाजात असल्यामुळे त्यांच्या सहकार्याने अशा संस्था यशस्वीपणे चालवता येतात.

श्री. पाटील सरांच्या पत्नी सौ. दीपा पाटील या संस्थेच्या मुख्याध्यापिका आहेत. त्यांनी 'मेंदूचा पक्षाघात' या विषयावर मुंबई विद्यापीठातून बी.एड. केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले असून त्यासाठी त्या दिल्लीला गेल्या होत्या.

संवेदना केंद्रात 15 ऑगस्ट, 26 जानेवारी यांसारखे राष्ट्रीय उत्सव तसेच गणेशोत्सवासारखे सांस्कृतिक सण उत्साहात साजरे केले जातात.

शिक्षक आणि कर्मचाऱ्यांसाठी नुकतीच चार दिवसांची सहल आयोजित करण्यात आली होती. सांगली, कोल्हापूर येथील प्रेक्षणीय स्थळांना त्यांनी भेट दिली.

या केंद्रात अलीकडेच औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) सुरू करण्यात आली आहे. मेंदूचा पक्षाघात (सेरेब्रल पाल्सी), कर्णबधिर आणि स्वमग्न अशा मुलांना औद्योगिक शिक्षण दिले जाते. कारण त्यांचा बुद्ध्यांक सुमारे 80 च्या आसपास असतो. काही मुले संगणकावरही उत्तम काम करतात.

विशेष म्हणजे, या शाळेत प्रत्येक दिव्यांग मुलाकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ही मुलेही आपल्या आवडीच्या क्षेत्रात उत्तम प्रगती करू शकतात, हे या संस्थेतील शिक्षकांनी सिद्ध करून दाखवले आहे.

ज्यांना शक्य असेल त्यांनी या संस्थेला अवश्य भेट द्यावी. त्यांच्या सदिच्छा आणि सहकार्यामुळे संस्था आणखी भरभराटीस येईल. श्री. पाटील सर तसेच सर्व शिक्षक आणि कर्मचारी यांना मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या या कर्मयोगास शतशः वंदन.

श्री सुरेश पाटील

संपर्क - 8805855626

सूर्यनमस्कार

मनामध्ये जिद्द, समाजाबद्दल प्रेम आणि तळमळ असेल, तर एक व्यक्ती आपल्या आयुष्यात उत्तम सामाजिक कार्य उभे करू शकते, हे श्री. सुभाषराव खर्डेकर यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे.

श्री. सुभाषराव खर्डेकर हे मूळचे नाशिकचे आहेत. ते श्री समर्थ रामदास स्वामी यांचे निस्सीम भक्त असून, श्री समर्थांचे सतरावे वंशज श्री भूषण स्वामी महाराज यांच्याकडून त्यांनी अनुग्रहही घेतला आहे.

श्री समर्थ रामदास स्वामी दररोज तब्बल १२०० सूर्यनमस्कार घालत असत. त्यांनी बालोपासनेबद्दलही अत्यंत महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. लहानपणापासून प्रत्येकाने उत्तम आरोग्य आणि सुदृढ शरीरप्रकृतीसाठी सूर्यनमस्काराचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. शरीर, मन आणि बुद्धी यांच्या संतुलित विकासासाठी सूर्यनमस्कार अत्यंत उपयुक्त ठरतो, हा संदेश समर्थांनी आपल्या शिकवणीतून दिला आहे.

सज्जनगडावर दरवर्षी मे महिन्यात संस्कार शिबिर आयोजित केले जाते. या शिबिरामध्ये सूर्यनमस्कार विभागाची जबाबदारी गेल्या वर्षापर्यंत श्री. सुभाषराव सरांकडे होती.

सर हे शिक्षणाने एम.ए., बी.एड. आहेत. त्यांनी नाशिक येथील ज्युनिअर कॉलेजमध्ये उपप्राचार्य म्हणून कार्य केले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या लेखनसूचीवर इंग्रजी विषयतज्ज्ञ म्हणूनही त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

शाळा आणि कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच त्यांनी स्काऊट म्हणून कार्य केले. तसेच भारत स्काऊट अँड गाईड संस्थेचे नाशिक जिल्हा कार्यवाह म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली.

या शैक्षणिक कार्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी स्वयंघोषित सूर्यनमस्कार कार्यकर्ता म्हणून पूर्णवेळ काम सुरू केले. विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार साधनेचे मार्गदर्शन करता यावे, या हेतूने त्यांनी www.suryanamaskar.info हे संकेतस्थळ विकसित केले. हे संकेतस्थळ मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले होते. या संकेतस्थळाला दररोज साधारणपणे ८०० हून अधिक लोक भेट देत असत. काही काळानंतर या संकेतस्थळाचे विसर्जन करण्यात आले असून, आता त्याचे नव्या स्वरूपात पुनरुज्जीवन होणार असल्याचे सरांनी सांगितले.

सुरुवातीला नाशिक येथे श्री समर्थांनी स्थापन केलेल्या टाकळी येथील मठात सूर्यनमस्कार उपासनेसाठी सर नियमित जात असत. महिन्यातील एक आठवडा ते रोज तेथे उपस्थित राहत होते.

सध्या त्यांच्या निवासस्थानी विनामूल्य सूर्यनमस्कार व प्राणायाम सराव घेतले जातात. तसेच चैत्र पाडव्यापासून रथसप्तमीपर्यंत ऑनलाइन मोफत सूर्यनमस्कार प्रशिक्षणही दिले जाते. गेली तेवीस वर्षे त्यांनी स्वतःला पूर्णपणे झोकून देत सूर्यनमस्काराच्या कार्यासाठी वाहून घेतले आहे.

“दररोज केवळ पंधरा मिनिटे सूर्यनमस्कार साधनेसाठी दिल्यास आनंददायी आरोग्याचे संवर्धन आणि संरक्षण होते,” हा संदेश सर्वदूर पोहोचवण्यासाठी त्यांनी ‘श्री सूर्यस्थान समर्थ विद्यारोग्य केंद्र, नाशिक’ या विश्वस्त संस्थेची स्थापना केली. मात्र, सध्या ही संस्था बरखास्त होत असून,

या चैत्र पाडव्यापासून सूर्यनमस्कार लोकचळवळ या उपक्रमांतर्गत वर्षभर चालणाऱ्या सूर्यनमस्कार प्रशिक्षणाच्या संदेशांचे संकलन करून त्यांनी तीन पुस्तके तयार केली आहेत.

या तीनही पुस्तकांचे हक्क साधक आणि वाचक यांच्या हाती सुरक्षित आहेत. या पुस्तकांवर सुभाष सरांचा कोणताही वैयक्तिक हक्क नाही. कुणीही या पुस्तकांचा वापर करून सूर्यनमस्कार प्रशिक्षणाचा प्रसार करू शकतो. खरेतर, प्रत्येक साधकाने सूर्यनमस्कार कार्यकर्ता व्हावे, हाच या पुस्तकांमागील मुख्य उद्देश आहे.

"समृद्ध, संपन्न आणि विश्वविजयी भारत" हे स्वप्न प्रत्येकाने पाहावे आणि ते साकार करण्यासाठी सर्व भारतीयांनी दररोज सूर्यनमस्कार यज्ञ करावा, हेच त्यांच्या कार्याचे अंतिम ध्येय आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याने हे स्वप्न साकार करण्यासाठी सहभागी व्हावे, अशी त्यांची अपेक्षा आहे.

लोकांची, लोकांनी, लोकांसाठी चालवलेली ही सूर्यनमस्कार चळवळ अखंड सुरू राहावी, म्हणजे प्रत्येकाला उत्तम ऊर्जा प्राप्त होईल. सर्व वयोगटातील स्त्री-पुरुष, बुद्धिजीवी असोत वा श्रमजीवी — सर्वांसाठी प्राणऊर्जा प्रदान करणारी ही एक प्रभावी साधना आहे.

हा लेख लिहिताना मला माझ्या बालपणातील एक आठवण सांगावीशी वाटते. आम्ही भिडे कुटुंबीय मी सात वर्षांची असताना जमखंडी येथे राहत होतो. त्या काळात राष्ट्रीय कीर्तनकार पटवर्धन बुवा चार महिन्यांसाठी जमखंडी येथे कीर्तनासाठी आले होते. कीर्तन संपल्यानंतर ते मुलांना सूर्यनमस्कार शिकवत असत. मीही त्यांच्या सूर्यनमस्कार वर्गाला आवडीने जात होते.

बारा सूर्यनमस्कार घातल्यानंतर ते आम्हा मुलांना कधी भिजवलेले कच्चे शेंगदाणे, तर कधी गूळ घालून केलेला कणकेचा लाडू द्यायचे. बालपणी झालेले हे व्यायामाचे संस्कार अजूनही माझ्यामध्ये टिकून आहेत. त्यामुळेच वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षीदेखील मी शारीरिक आणि मानसिक उत्तम आरोग्याचा आनंद घेत आहे. या उत्तम आरोग्यामुळेच मी आजही कार्यरत राहू शकले आहे.

श्री. सुभाष खर्डेकर सर करीत असलेले सूर्यनमस्कार प्रशिक्षणाचे कार्य प्रत्येकाच्या आरोग्यास निश्चितच लाभदायी आहे. त्यांच्या या कर्मयोगास मनःपूर्वक शुभेच्छा!

श्री. सुभाष खर्डेकर
संपर्क - 9403914374

अवयवदान

आपण आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्या कुवतीनुसार काही ना काही दान करत असतो. मात्र, काही दाने ही अतिशय श्रेष्ठ आणि मानवतेसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जातात. प्रत्येक व्यक्तीने या दानांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. नेत्रदान, देहदान, अवयवदान आणि त्वचादान ही समाजासाठी अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी दाने आहेत.

श्री. सुनील देशपांडे सर यांनी अवयवदानासंबंधी मोठे कार्य केले आहे. ते सध्या पुण्यात वास्तव्यास आहेत. त्यांचे शालेय शिक्षण कोयनानगर येथे झाले. १९६७ साली झालेल्या भूकंपापर्यंत ते कोयनानगरमध्येच राहत होते. त्यानंतर त्यांनी कऱ्हाड येथे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले.

नोकरीच्या निमित्ताने ते सोलापूर येथे होते. तसेच पुणे आणि कऱ्हाड येथेही त्यांनी काम केले. ते मार्केट सर्व्हे रिप्रेझेंटेटिव्ह म्हणून कार्यरत होते. नोकरीनंतर त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू केला. काही वर्षे ते साताऱ्यात राहिले, तर नंतर त्यांनी नाशिक येथे अनेक वर्षे व्यवसाय केला. व्यवसाय सांभाळत असतानाच त्यांनी अवयवदान या सामाजिक कार्याला सुरुवात केली.

कोरोनाच्या काळात त्यांना व्यवसाय बंद करावा लागला आणि त्यानंतर त्यांनी तो पुन्हा सुरू केला नाही. त्याऐवजी त्यांनी पूर्ण वेळ अवयवदानाच्या जनजागृतीसाठी स्वतःला वाहून घेतले. सुरुवातीला नाशिकमध्ये त्यांनी या प्रबोधनकार्याची सुरुवात केली. आता दोन वर्षांपासून ते पुण्यात राहत आहेत. नाशिकमध्ये त्यांनी तब्बल सहा वर्षे अवयवदान जनजागृतीचे कार्य केले.

२०१६ पासून त्यांनी चार पदयात्रा काढल्या. महाराष्ट्रभर सुमारे चार हजार किलोमीटर पायी चालत जाऊन त्यांनी अवयवदानाचे प्रबोधन केले. जवळपास पन्नास हजार लोकांपर्यंत त्यांनी अवयवदानाचा संदेश पोहोचवला आणि साडेपाच हजारांहून अधिक प्रबोधनपर कार्यक्रम राबवले. त्यामुळे हा विषय आता पन्नास ते साठ हजार लोकांपर्यंत पोहोचला आहे.

राज्यस्तरावर त्यांनी अवयवदानासाठी एक ऑनलाइन संस्था स्थापन केली असून त्या संस्थेचे ते उपाध्यक्ष आहेत. या संस्थेमार्फत सध्या महाराष्ट्रातील बारा जिल्ह्यांमध्ये हे कार्य सुरू आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात हे कार्य पोहोचावे, अशी त्यांची इच्छा आहे. प्रत्येक जिल्ह्यातील शाखेमार्फत हा विषय प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचला पाहिजे, यासाठी त्यांची सातत्याने धडपड सुरू आहे.

सर म्हणतात, “अवयवदान हा शब्द प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवणे हे आमचे काम आहे. हे दान करायचे की नाही, हा प्रत्येकाचा वैयक्तिक निर्णय आहे. मात्र प्रबोधन करणे हे माझे कर्तव्य आहे.”

या विषयाबाबत जितकी जागृती व्हायला हवी, तितकी अजून झालेली नाही. त्यामुळे ज्यांना या विषयात रस आहे, अशा लोकांना प्रशिक्षण देण्याचे काम त्यांनी सुरू केले आहे. आतापर्यंत दहा ते बारा प्रशिक्षण वर्ग त्यांनी घेतले आहेत. या प्रशिक्षणातून कार्यकर्ते तयार होत आहेत. मात्र, काही लोक चुकीची माहिती समाजात पसरवतात, असा अनुभवही त्यांना आला आहे. त्यामुळे योग्य प्रशिक्षण घेऊनच लोकांपर्यंत खरी माहिती पोहोचवावी, असे ते कार्यकर्त्यांना आवर्जून सांगतात. अत्यंत नाममात्र शुल्क घेऊन हे प्रशिक्षण दिले जाते.

ही माहिती सांगत असताना मी त्यांना एक अनुभव सांगितला. कागवाड युवती मंडळातर्फे आम्ही दरवर्षी ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवतो. एका वर्षी नेत्रदान, अवयवदान आणि देहदान याविषयी माहिती देण्यासाठी सांगलीहून एका डॉक्टर मॅडमना बोलावले होते. त्यांचे मार्गदर्शन झाल्यानंतर लोकांनी काही प्रश्न विचारले.

एका व्यक्तीने विचारले की, अपघातामुळे एखाद्याचा मेंदूमृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबीयांकडून किडनी, लिव्हर, हृदय यांसारखे अवयव दान केले जातात. दान देणारी व्यक्ती कोणतीही किंमत घेत नाही; मात्र ज्याला अवयव प्रत्यारोपण केले जाते, त्याला प्रचंड खर्च येतो. मध्यमवर्गीय व्यक्तीला हा खर्च परवडत नाही.

या प्रश्नावर सरांनी अतिशय समर्पक उत्तर दिले. ते म्हणाले, "अवयव प्रत्यारोपणानंतर रुग्णाची विशेष काळजी घ्यावी लागते. त्यासाठी उच्च प्रतीची वैद्यकीय साधने आणि सुविधा आवश्यक असतात. त्यामुळे अशा सुविधा असलेल्या हॉस्पिटलमध्ये ऑपरेशनचा खर्च मोठा असतो. मात्र, काही रुग्णांना केईएम किंवा ससूनसारख्या शासकीय हॉस्पिटलमध्ये कमी खर्चात उपचार मिळू शकतात; पण अनेकांना ते पटत नाही. महात्मा फुले, संजय गांधी यांसारख्या शासकीय योजनांमधूनही आर्थिक मदत मिळू शकते."

मी त्यांना आणखी एक प्रश्न विचारला की, देहदानानंतर संबंधित मेडिकल कॉलेजने त्या व्यक्तीच्या नातेवाईकांना एखाद्या दिवशी बोलावून कृतज्ञता व्यक्त करायला नको का? तसेच देहदानाबद्दल एखादे प्रमाणपत्रही द्यायला हवे.

त्यावर सर म्हणाले, “काही मेडिकल कॉलेजेस एका वर्षात ज्या व्यक्तींचे देहदान झाले असेल, त्यांच्या नातेवाईकांना एकत्र बोलावून कृतज्ञता व्यक्त करतात. मात्र, सर्वच मेडिकल कॉलेजांनी ही पद्धत राबवली पाहिजे, यासाठी आम्ही शासनाकडे पाठपुरावा करत आहोत.”

पुढे त्यांनी आणखी माहिती दिली की, देहदानानंतर तो देह विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी वापरला जातो. त्यातील हाडे वेगळी काढली जातात आणि उरलेले शरीर पुरले जाते किंवा दहन केले जाते.

आदरणीय बाबा आमटे यांनी आनंदवनात मृत्यूनंतरची एक वेगळी पद्धत सुरू केली होती. तेथे देह पुरला जातो, आजूबाजूला मुंग्या लागू नयेत म्हणून मीठ टाकले जाते आणि त्यावर एक झाड लावले जाते.

सर म्हणाले, “आपल्याकडे मात्र अशा प्रकारे देह पुरण्यासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध नाही.”

ते पुढे म्हणाले, “कोणाला काही प्रश्न असतील, तर ऑनलाइन मीटिंगद्वारेही चर्चा करू शकतो.” खरोखरच, सरांनी स्वतःला या कार्यासाठी पूर्णपणे समर्पित केले आहे.

नेत्रदान, देहदान आणि अवयवदान या संकल्पना लोकांच्या मनात रुजायला निश्चितच वेळ लागणार आहे. मात्र, या विषयाची जागृती करण्यासाठी कार्यकर्ते तयार करणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे.

श्री. सुनील देशपांडे

संपर्क- 9657709640

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केलेली गणेशाची प्रार्थना!

भारतरत्न सावरकरांनी रचलेल्या श्रीगणेश प्रार्थनेवर आधारित हा लेख मी लिहित आहे.

आमच्यासाठी स्वातंत्र्यवीर श्री. सावरकर हे भारतरत्नच आहेत. आदरणीय देशभक्त सावरकर मोठ्या तळमळीने श्री गजाननाची प्रार्थना करतात. श्रीगणेशच सर्व संकटांतून आपली सुटका करील, या दृढ श्रद्धेने ते त्याचे स्तवन करतात. कारण गणपती हा विघ्नहर्ता आहे.

अशा गणेशाला उद्देशून ते म्हणतात, "हे गजानना, तूच आमचा मायबाप आहेस. तूच आमचा आधार आहेस. देशावर आलेल्या संकटांतून तूच आम्हाला तारून ने."

या प्रार्थनेत ते पुढे सांगतात की, भारतावर मुस्लीम सत्ताधीशांचे राज्य आले. अनेक राजपूत राजांनी मोठ्या शौर्याने त्यांच्याशी संघर्ष केला; परंतु अनेक जण रणांगणात धारातीर्थी पडले. त्यांच्या पत्नींनी सती जाण्याचा मार्ग स्वीकारला. पारतंत्र्य आणि अत्याचारांचे जीवन त्यांना मान्य नव्हते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अफझलखानाचा वध केला आणि हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. पुढे मराठ्यांचे सामर्थ्य इतके वाढले की दिल्लीचे तख्तही त्यांच्या प्रभावाखाली आले. श्री. राघोबादादा पेशव्यांनी अटकेपार झेंडा नेला. परंतु नंतर देशावर पुन्हा संकट आले आणि इंग्रजांनी भारतावर पारतंत्र्य लादले. हे गणराया, तूच आम्हाला या पारतंत्र्यातून तारून ने. कारण तूच आमचा आधार आहेस, तूच आमचा मायबाप आहेस.

देशाला स्वातंत्र्य मिळावे, ही तळमळ सावरकरांच्या मनात सतत धगधगत होती. सावरकरांवर अनेकदा नास्तिक असल्याचा आरोप केला जातो; परंतु ते अजिबात खरे नाही. तसे असते, तर त्यांनी गजाननाची अशी आर्त प्रार्थना केली नसती. इंग्रजांच्या तावडीतून देशाची सुटका व्हावी, यासाठी त्यांनी गणरायाला साकडे घातले.

श्री. सावरकर हे विज्ञाननिष्ठ होते. प्रत्येक गोष्टीचा बुद्धीच्या कसोटीवर विचार करून निर्णय घेणारे होते. त्याचबरोबर ते धर्मनिष्ठही होते. हिंदू धर्माबद्दल त्यांना जाज्वल्य अभिमान होता; परंतु याचा अर्थ ते इतर धर्मांना कमी लेखत होते, असा नव्हता. प्रत्येक देशाने आपल्या राष्ट्रावर नितांत प्रेम करावे, असे त्यांचे मत होते; मात्र ते प्रेम दुसऱ्या देशावर सत्ता गाजविण्यासाठी नसावे.

धर्माविषयी सावरकरांची मते अत्यंत व्यापक होती. ते सर्वधर्मसमभाव मानत. समाजातील जातिभेदाच्या भिंती तोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या मते, जाती माणसाने निर्माण केल्या आहेत. भगवान श्रीकृष्णांनी वर्णाश्रम व्यवस्था सांगितली असली, तरी प्रत्येक व्यक्तीची क्षमता वेगवेगळी असते. ज्याच्याकडे ज्ञान अधिक आहे तो ब्राह्मण, जो शौर्यवान आहे तो क्षत्रिय; परंतु शेवटी आपण सर्व माणसेच आहोत. मानवता हाच सर्वांचा खरा धर्म आहे, असे त्यांचे मत होते.

सावरकरांचे व्यक्तिमत्त्व सर्व अंगांनी समृद्ध होते. राजकीय, सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील त्यांची कामगिरी पाहिली, तर त्यांच्या विलक्षण व्यक्तिमत्त्वाची प्रचीती येते.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील तेवीस वर्षे तुरुंगात घालविली. अंदमानातील सेल्युलर तुरुंगात अत्यंत कठोर शिक्षा भोगताना, त्या प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी 'कमला' हे महाकाव्य रचले.

ते म्हणत असत की, हिंदुत्व ही केवळ धार्मिक संकल्पना नसून एक संस्कृती, एक जीवनदृष्टी आणि एक व्यापक तत्त्व आहे. त्या हिंदू संस्कृतीबद्दल त्यांना नितांत प्रेम होते. म्हणूनच भारतासारखा महान देश परकीयांच्या ताब्यात राहू नये, यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले.

आपली संस्कृती ज्या गणरायाची प्रथम पूजा करते, त्या गणरायाची त्यांनी मोठ्या तळमळीने प्रार्थना केली. 'हे गणराया, आता तूच धावून ये आणि आम्हाला या पारतंत्र्यातून मुक्त कर. तूच आमचा आधार, तूच आमचा त्राता, तूच आमचा मायबाप आहेस,' अशी त्यांची आर्त हाक होती.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी गणरायाकडे केलेली ही प्रार्थना आणि देशभक्तांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले. भारत देश पारतंत्र्यातून मुक्त झाला. आपण सर्वजण आज स्वातंत्र्याचा श्वास घेऊ शकत आहोत. त्या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना मनःपूर्वक वंदन!

श्री समर्थांची करुणाष्टके

अनुदिनी अनुतापे तापलो रामराया ।

परम दीनदयाळा, निरसी मोहमाया ॥

श्री समर्थ रामदास स्वामींनी अंतःकरणापासून आर्ततेने श्रीरामाला हाक मारली आहे. ईश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी समर्थांनी केलेली ही एक उत्कट प्रार्थनाच आहे. प्रार्थनेमुळे अंतःकरणात प्रेम, भक्ती आणि आर्तता निर्माण होते व ती शब्दांद्वारे व्यक्त होते.

श्री समर्थांनी श्रीरामरायाला जी आर्त हाक मारली आहे, त्यामध्ये रामाविषयीची त्यांची तीव्र ओढ दिसून येते. रामाच्या दर्शनाची त्यांना आस लागलेली आहे. श्रीरामाच्या भेटीसाठी व दर्शनासाठी ते आतुर झाले आहेत. परंतु ही मोह-माया त्यांना त्या परमसुखापासून दूर ठेवते. म्हणूनच ती नाहीशी व्हावी, अशी त्यांची प्रार्थना आहे.

ते म्हणतात, “माझे हे चंचल आणि अचपळ मन आवरत नाही; ते मला आवरता यावे.” आपल्या सर्वांनाच आपल्या मनाच्या चंचलतेचा अनुभव येत असतो. मन सतत एका विचारातून दुसऱ्या विचाराकडे धावत असते.

श्री समर्थ श्रीरामाला विनवतात, “मी आता संसारतापाने थकलो आहे; म्हणून तू धावून ये आणि मला तुझा आधार दे.” समर्थांचे अंतःकरण भक्तिभावाने आणि प्रेमाने चिंब भिजलेले आहे. करुणाष्टकांमधून ते श्रीरामाशी जणू संवादच साधतात. त्यांची करुणाष्टके म्हणजे श्रीरामावरील त्यांच्या अतूट भक्तीची आणि अनन्य प्रेमाची साक्ष होय.

संसारतापाने होरपळून निघालेल्या मनाला शांतता लाभावी म्हणून ते श्रीरामाला पुन्हा पुन्हा विनवणी करतात—

“जळत हृदय माझे जन्म कोट्यानुकोटी ।

मजवरी करुणेचा राघवा पूर लोटी ॥”

या शब्दांमधून समर्थांची भक्ती, त्यांची तळमळ आणि श्रीरामावरील अखंड श्रद्धा स्पष्टपणे प्रकट होते.

कंठाशी प्राण आणून मी तुझी वाट पाहत आहे. तू अचानक येऊन मला भेट दे; मी तुला प्रेमाने मिठी मारीन. हे रामराया, तू मला लवकर आपलासा करून घे. मला आता उपरती झाली आहे. केवळ तूच माझे विश्रामधाम आहेस. खऱ्या सुखाची जाणीव आता मला झाली आहे. म्हणून माझा प्रत्येक क्षण रामनामात आणि तुझ्या भजनात व्यतीत होऊ दे.

पाण्यात राहणाऱ्या जलचरांना जशी पाण्याची खोली समजत नाही, त्याप्रमाणे मीही अज्ञानामुळे आणि असंख्य चुका केल्यामुळे तुझे महत्त्व व तुझे गुण ओळखू शकलो नाही. पण हे रामराया, तरीही तू मला लवकर दर्शन दे.

श्री समर्थांनी सहा करुणाष्टके रचली आहेत. त्यामध्ये ते अत्यंत नम्रतेने म्हणतात की, या जगात असंख्य भक्त होऊन गेले. त्यांनी विविध साधना केल्या, भक्ती केली आणि ईश्वरप्राप्तीचा मार्ग स्वीकारला. परंतु, “हे रामा, माझा जन्म मात्र व्यर्थ गेला,” असेच मला वाटते.

तुझ्यावर अनन्य प्रेम करणारे, तुझी कीर्ती गाणारे आणि तुझी भक्ती करणारे कितीतरी दास या पृथ्वीवर जन्मले. त्यांची निष्ठा, त्यांची भक्ती आणि त्यांचे

समर्पण पाहून मी चकित होतो. परंतु माझे जीवन मात्र व्यर्थ गेले, अशी खंत माझ्या मनात निर्माण होते.

हे रामा, तुझा दास असूनही मी तुझी खरी सेवा करू शकलो नाही. तुझा भक्त म्हणवून घेत असूनही माझ्याकडून अपेक्षित साधना घडली नाही. त्यामुळे तुझा दास असूनही मी निकामी ठरलो, असेच मला वाटते.

रघुनायकाकडे श्री समर्थ एक वेगळेच मागणे मागतात. ते म्हणतात की, मला कामिनी-कांचनाचा मोह नको; कारण त्यामध्ये अडकलेला मनुष्य जन्म-मृत्यूच्या चक्रात गुरफटून जातो. मला ज्ञानमार्गाचीही लालसा नाही; कारण ज्ञानामुळे मनामध्ये अहंकाराचा फुगारा निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणूनच त्यांना सगुण भक्तीचा मार्ग अधिक प्रिय वाटतो. ते श्रीरामाकडे अखंड सगुण भक्तीची याचना करतात. संसारातील संकटे, चिंता आणि दुःख यांनी व्याकुळ झालेल्या मनाला श्रीरामाच्या प्रेमाचा स्पर्श लाभून ते शांत व्हावे, हीच त्यांची प्रार्थना आहे.

रघुनाथ हा आपल्या प्रेमळ भक्तांचा उद्धार करणारा आहे. म्हणूनच त्याने माझ्यावरही कृपा करावी, अशी निर्वाणीची विनवणी श्री समर्थ या करुणाष्टकात करतात.

“बुद्धी दे रघुनायका” या करुणाष्टकात ते म्हणतात की, आम्ही काया, वाचा आणि मनाने रघुनायकाचे आहोत. त्यामुळे आमची लाज राखणे हे त्यालाच शोभते. आम्हाला सद्बुद्धी देऊन उपकृत करावे, अशी ते आर्त याचना करतात.

जगात कोणी कौतुकाचे शब्द बोलत नाही; उलट लोक कुचेष्टा करतात. सावधपणाचा अभाव असल्यामुळे अनेक गोष्टींचा विसर पडतो. म्हणूनच

श्री समर्थ श्रीरामाकडे विवेकपूर्ण आणि सावध बुद्धीची याचना करतात. त्यांनी पूर्ण शरणागती पत्करून आपल्या जीवनाची सर्व जबाबदारी रघुनायकावर सोपवली आहे. अत्यंत काकुळतीने ते रघुनाथाच्या करुणेची याचना करीत आहेत.

श्री समर्थ अत्यंत उदासीन झाले होते. मनाला बळेबळे कुठेतरी गुंतवण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांना कुठेच समाधान मिळत नव्हते.

ते म्हणतात, “हे रामा, तुझ्या वियोगाने माझी काया व्याकुळ झाली आहे. त्यामुळे माझे मन अत्यंत उदास झाले आहे. तुझी सेवा मला अखंड घडू दे. तुझे दर्शन झाल्याशिवाय मला मरण येऊ देऊ नकोस. दिवसेंदिवस माझे आयुष्य मला व्यर्थ वाटू लागले आहे.”

“हे रामराया, तू भक्तांचा सांभाळ करणारा आहेस. त्यामुळे हे भूपाळा, तुला भेटण्याची मला अतोनात आतुरता लागली आहे.”

“तुजविण रामा मज कंठवेना” या करुणाष्टकात ते प्रार्थना करतात—

“आम्हा अनाथां तू एकदाता ।

संसारवेथा चुकवी समर्था ॥”

हे रामा, मी असे जीवन किती काळ कंठू? माझे हे भाग्य कधी पालटणार? संसाराच्या या असह्य वेदनांनी मी अत्यंत त्रस्त झालो आहे. आता तूच माझी या दुःखातून सुटका कर, अशी आर्त विनवणी श्री समर्थ रामदास स्वामी श्रीरामचंद्रांच्या चरणी करतात.

श्री समर्थांनी या सर्व करुणाष्टकांद्वारे श्रीरामाची अत्यंत आर्ततेने आळवणी केली आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दातून रामभक्ती, तळमळ, शरणागती आणि ईश्वरप्राप्तीची उत्कट इच्छा व्यक्त होते.

असे हे श्री समर्थ रामदास स्वामी! तळमळीने आणि अनन्य भावनेने श्रीरामाकडे करुणेची याचना करणारे. त्यांच्या या अखंड भक्तीची, निष्ठेची आणि आर्त हाकांची दखल श्रीरामरायालाही घ्यावी लागली. अखेरीस श्रीरामाने त्यांना सगुण दर्शन देऊन त्यांच्या भक्तीचे सार्थक केले.

असे हे आगळे-वेगळे संत! ज्यांनी केवळ स्वतःच्या उद्धाराचा विचार केला नाही, तर इतर भक्तांनाही अध्यात्ममार्गाचा लाभ मिळावा यासाठी अथक प्रयत्न केले. श्रीदासबोध, मनाचे श्लोक, आनंदवनभुवन यांसारखे अमूल्य ग्रंथ लिहून त्यांनी समाजाला मार्गदर्शन केले आणि असंख्य भक्तांना सन्मार्गाकडे वळविले.

आजही त्यांच्या ग्रंथांमधून भक्ती, विवेक, वैराग्य, कर्तव्यनिष्ठा आणि आत्मोन्नतीचा मार्ग स्पष्टपणे दिसून येतो. म्हणूनच श्री समर्थ रामदास स्वामी यांचे कार्य आणि विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे आणि मार्गदर्शक ठरत आहेत.

गणेश चतुर्थी

श्री गणपतीचे आगमन नुकतेच झाले आहे. ज्यांच्याकडे दीड दिवसांचा गणपती असतो, त्यांच्याकडे श्री गणपतीचे विसर्जनही झाले आहे. श्री गणपती उत्सव म्हटला की सर्वत्र आनंदी आणि उत्साही वातावरणाची निर्मिती होते. घरातही त्यानिमित्ताने कुटुंबातील मंडळी आरती व पूजेसाठी एकत्र जमतात. गणेशाची मनोभावे पूजा व आरती करतात. त्यामुळे प्रसन्न वातावरण निर्माण होते.

श्री गणपतीच्या भक्तीमुळे माणसाचे मन समाधानी व आनंदी बनते. मनाचे आरोग्यही सुधारते. उत्तरपूजेच्या वेळी गुरुजी घरातील मंडळींना सांगतात की, "जे हवे ते गणपतीकडे मागून घ्या." परंतु आपण काय मागतो? बहुतेक वेळा केवळ सुखाच्या गोष्टीच गणपतीकडे मागतो. ऐहिक सुखाच्या पलीकडे आपला विचार सहसा जात नाही. आपला प्रपंच सुखाचा व्हावा, जीवनात अडचणी येऊ नयेत, यासाठीच आपण गणपतीकडे विविध मागण्या करतो.

गणपतीचे श्रेष्ठत्व व महत्त्व इतके आहे की प्रत्येक शुभकार्याच्या प्रारंभी श्री गणपतीची पूजा केली जाते. लोकमान्य टिळकांनीसुद्धा गीतारहस्य हा ग्रंथ लिहिण्यास सुरुवात करताना प्रथम गणेशवंदना केली. स्वातंत्र्यवीर सावरकरांनीदेखील मोठ्या तळमळीने व आर्ततेने श्री गणेशाची प्रार्थना केली आहे. परंतु त्यांनी गणरायाकडे स्वतःसाठी काहीही मागितले नाही. उलट ते गणरायाला विनवतात, "हे गणराया, तू विघ्नहर्ता आहेस. या पारतंत्र्याच्या संकटातून तूच आम्हाला मुक्त करू शकतोस. तूच आमचा

मायबाप आहेस, तूच आमचा आधार आहेस. इंग्रजांनी आमच्यावर पारतंत्र्य लादले आहे; त्यातून तूच आम्हाला सोडव."

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे भारतमातेवर नितांत प्रेम होते. हिंदू धर्म व हिंदू संस्कृतीबद्दल त्यांना जाज्वल्य अभिमान होता. हिंदू संस्कृतीमध्ये प्रत्येक मंगल कार्याच्या प्रारंभी ज्या गणरायाचे स्मरण केले जाते, त्या गणरायाची त्यांनी अत्यंत तळमळीने प्रार्थना केली आणि देशाला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी त्याने धावून यावे, अशी आर्त साद घातली.

श्री समर्थ रामदास स्वामींनी २०५ मनाचे श्लोक रचले. त्यांच्या आरंभीचा श्लोक असा आहे –

"गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा ।

मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।

नमो शारदा मूळ चत्वार वाचा ।

गमू पंथ आनंत या राघवाचा ॥"

अनेक गीतांमधून आपण श्री गणपतीचे रूप, त्याचे गुण आणि त्याचे महत्त्व यांचे वर्णन ऐकतो. आदरणीय लोकमान्य टिळक आपल्या गीतारहस्य या ग्रंथात सांगतात की, मनुष्याला जन्माला आल्यानंतर कर्म करावेच लागते; त्यातून कुणालाही सुटका नाही. चांगल्या किंवा वाईट कर्माचे फळ मिळतेच. "करावे तसे भरावे", "बीज तसे फळ" हा निसर्गनियम आहे. परंतु मनुष्याने कर्म निष्काम भावनेने केले, तर त्याच्यावर कर्मबंधने पडत नाहीत. विशिष्ट फळप्राप्तीच्या अपेक्षेने कर्म करू नये; ते निष्काम भावनेने करावे. "इदं न मम" ही वृत्ती ठेवून केलेले कर्मच खऱ्या अर्थाने यज्ञस्वरूप ठरते.

लोकमान्य टिळकांनीसुद्धा गीतारहस्य या ग्रंथाच्या प्रारंभी श्री गणेशाला वंदन करून त्याची प्रार्थना केली आहे. परंतु या सर्व महान व्यक्तींनी केलेली गणेशप्रार्थना स्वतःच्या स्वार्थासाठी नव्हती; ती समाजहितासाठी होती. हाच त्यांचा निःस्वार्थ आणि निष्काम कर्मयोग होय.

सामान्य माणसानेही गणेशाची प्रार्थना करताना केवळ ऐहिक सुखांची मागणी न करता समाजाच्या कल्याणासाठी प्रार्थना करावी. दयाळू परमेश्वर अशा निःस्वार्थ प्रार्थनेला निश्चितच प्रतिसाद देतो. अशा भावनेतून केलेली उपासना सामान्य माणसालाही आत्मोन्नतीच्या आणि मोक्षाच्या मार्गावर एक पाऊल पुढे नेऊ शकते.

जनी जाणता पाय त्याचे धरावे!

सामान्य माणसाच्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्याला मार्गदर्शन करणारी एखादी जाणती व्यक्ती असते. लहानपणी आई-वडील हेच आपल्यासाठी सर्वस्व असतात. तेच आपले पहिले मार्गदर्शक आणि जाणते असतात. पुढे शिक्षण घेत असताना शिक्षक हेच आपल्यासाठी सर्वस्व बनतात. शिक्षकांविषयी मनात नितांत प्रेम, आदर आणि विश्वास असतो. जीवनातील अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडेच आहेत, अशी आपली ठाम श्रद्धा असते.

पुढे अर्थार्जनाच्या प्रवासात पाऊल टाकल्यावर, इच्छा असो वा नसो, वरिष्ठांप्रती मान झुकवावीच लागते.

सर्व प्रापंचिक जबाबदाऱ्यांतून मुक्त झाल्यावर माणूस हळूहळू परमार्थाकडे वळतो. त्या वेळी खरा जाणता कोण आहे आणि त्याच्या चरणी का जावे, याची जाणीव होऊ लागते.

श्री समर्थ रामदास स्वामी हे प्रापंचिकांचे खरे गुरु मानले जातात. कारण दासबोधातून ते सतत सांगतात की प्रपंच नेटकेपणाने करा; त्यात कोणतीही कुचराई करू नका. सत्याने वागा. देहाच्या सुखासाठी इंद्रियांच्या माध्यमातून उपभोग घ्या, परंतु त्यालाही मर्यादा असू द्या.

मनुष्य हा असा एकमेव प्राणी आहे की ज्याला परमेश्वराने बुद्धीचे वरदान दिले आहे. त्या बुद्धीचा योग्य उपयोग करून खरा जाणता कोण आहे, हे ओळखा आणि मनुष्यजन्माचे सार्थक करा. अंतरात्माच खरा जाणता असल्याने त्याला जाणणारा मनुष्यच खरा ज्ञानी ठरतो. तो आत्मज्ञानस्वरूप असतो. आत्मज्ञान प्राप्त झालेला पुरुष स्वतः ज्ञानमय बनतो. अशा आत्मज्ञानी पुरुषाच्या सहवासात राहावे आणि जीवनाची सर्व अंगे त्याच्याकडून शिकून घ्यावीत.

आपण अज्ञानी असल्यामुळे आजपर्यंत जे काही केले, त्यातील चुका ओळखून यापुढे जाणतेपणाने, विवेकाने आणि नीटनेटकेपणाने वागले पाहिजे. जाणत्या पुरुषाची संगत धरली पाहिजे. त्याची सेवा केली पाहिजे. अंतरात्म्याचे स्वरूप जाणून घेण्याची जी सूक्ष्म बुद्धी त्याच्याकडे असते, ती आपण आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या शंका-कुशंका त्याच्यासमोर मांडून त्यांचे निरसन करून घ्यावे. जाणत्यासाठी आपली काया झिजवावी.

वास्तविक अंतरात्माच खरा जाणता आहे. त्याला जो ओळखतो, तोच खरा जाणता होय. अंतरात्म्याच्या सत्तेनेच हे सारे जगत चालते आणि जगते. म्हणून आत्म्याचे कर्तृत्व ओळखून त्याचे अखंड चिंतन व ध्यान करावे. तो अतिशय सूक्ष्म असल्याने डोळ्यांना दिसत नाही. त्यामुळे अंतर्मुख होऊन त्याचे दर्शन घ्यावे. अंतरात्माच एकमेव खरे तत्त्व आहे. त्याचा महिमा वर्णन करणे अशक्य आहे. त्याची विद्या, त्याच्या कला आणि त्याचे गुण यांचा अंत कोणालाही लागत नाही. तो सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप आणि अनंत आहे.

अशा अंतरात्मारूपी परमेश्वराचे गुणगान करावे आणि त्याच्याविषयी सतत चिंतन-मनन करावे.

परमेश्वराने हे विश्व निर्माण केले आहे; परंतु ते सतत परिवर्तनशील आहे. आपल्या दृष्टीस दिसणारे हे विश्व आणि ते निर्माण करणारा जगदीश्वर हे दोन्ही वेगळे आहेत, हे प्रथम समजून घेतले पाहिजे. विवेकी माणसे जाणत्या पुरुषाकडून या विश्वाचे स्वरूप सतत जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. जे काही निर्माण झाले आहे ते सर्व जगदीश्वराने निर्माण केले आहे; परंतु तो स्वतः अत्यंत सूक्ष्म असल्याने डोळ्यांना दिसत नाही. म्हणून विवेकाच्या साहाय्याने त्याचे अस्तित्व अनुभवण्याचा प्रयत्न करावा.

साधकाला जे काही बोलायचे असेल, ते अंतरात्म्याच्या अनुसंधानाने बोलावे. अंतरात्मा आपल्या भक्ताला संसारबंधनातून मुक्त करतो. अर्थात, या गोष्टी केवळ वाचून किंवा ऐकून समजत नाहीत; त्या प्रत्यक्ष अनुभवाव्या लागतात. त्यासाठी प्रयत्न करणे हे मनुष्याच्या हातात आहे. देहाविषयीची माया, मोह आणि आसक्ती कमी झाली, तरच या मार्गावर पुढे जाता येते.

जयश्री पटवर्धन यांची
ईसाहित्य वरील पुस्तकं